रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १३२
www.ramprahar.com

◆ शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## गोंदियात ११ जहाल नलक्षवाद्यांचे पोलिसांसमोर आत्मसमर्पण



**गोंदिया :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (माओवादी) महाराष्ट्र-मध्य प्रदेश-छत्तीसगड विशेष क्षेत्रीय समितीने आत्मसमर्पणासाठी १ जानेवारी २०२६ची मुदत मागितली होती. प्रवक्ता अनंत याने या संदर्भात २७ नोव्हेंबरला पत्रक जारी केले होते, पण त्यापूर्वीच महाराष्ट्र-मध्य प्रदेश-छत्तीसगड विशेष क्षेत्रीय समितीचा प्रवक्ता अनंत याच्यासह दरेकसा दलमच्या ११ जहाल नक्षलवाद्यांनी शुक्रवारी (दि.२८) सायंकाळी गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. यामुळे नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे. याला गोंदिया पोलीस जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी दुजोरा दिला असून या संदर्भातील शनिवारी माहिती देणार असल्याचे सांगितले. जहाल नलक्षवादी हिडमा हा काही दिवसांपूर्वी चकमकीत ठार झाला होता. तेव्हापासून नक्षलवादी चळवळीला धक्का बसला असून ही चळवळ कमकुवत झाली आहे.

अंतरंग

पेणकरांच्या समस्या सोडवण्यास महायुती कटिबद्ध -पाटील/२

माथेरानमध्ये ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची गरज/५

विराट कोहलीसाठी धोनी बनला सारथी..!/८

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा झंझावाती प्रचार दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**रायगड जिल्ह्यात नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून भाजपचे जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २८) महाड, रोहा, पेण येथे झंझावाती दौरा करून उमेदवारांना मार्गदर्शन केले तसेच मतदारांशी संवाद साधला. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, उमेदवारांनी उपस्थित राहून निवडणूक तयारी व प्रचार मोहिमेविषयी अवगत केले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या या दौऱ्याला स्थानिकांचा उत्तम प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले.**

## महाडमध्ये उमेदवारांना मार्गदर्शन, नागरिकांच्या घेतल्या भेटीगाठी



**महाड : प्रतिनिधी**

भाजप रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी सकाळी सर्वप्रथम महाड भाजप कार्यालयाला भेट देत नगर परिषद निवडणूक लढवत असलेल्या उमेदवारांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमवेत प्रभाग क्रमांक ७, ८ व ९मध्ये प्रतिष्ठित नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या.

महाड नगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी यांची युती झाली असून युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आमदार प्रशांत ठाकूर महाड येथे आले होते. या दौऱ्यादरम्यान त्यांनी चवदार तळे येथील भाजप कार्यालयाला भेट देऊन उमेदवारांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, निवडणूक ही केवळ एक प्रक्रिया आहे. निवडणुकीनंतर नगरपालिकेत काम करीत असताना निवडून आलेल्या भाजपच्या नगरसेवकांनी येथे आपला पक्ष कसा वाढेल यासाठी प्रयत्न करावे तसेच नागरिकांच्या मूलभूत समस्या व शहराच्या विकासासाठी योगदान द्यावे. **(पान २ वर..)**

## रोह्यात बैठक, मतदारांशीही साधला संवाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषद निवडणुकीत तयारीचा आढावा घेण्यासाठी भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी तेथील भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवारांची भेट घेऊन चर्चा केली. त्याचप्रमाणे मतदारांशी संवाद साधून संवाद साधला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी शहरातील विविध भागांत प्रत्यक्ष जाऊन नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि आगामी निवडणुकीत युतीकडून सकारात्मक बदल घडवण्याचा विश्वास व्यक्त केला.

या वेळी भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, सरचिटणीस कृष्णा बामणे, परेश चितळकर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रिया कासार, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, शहराध्यक्ष मृणाल पेंडसे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष नरेश कोकरे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस व उमेदवार रोशन चाफेकर, शहराध्यक्ष सुमित रिसबुड, ज्योती सनलकर, दक्षिण मोर्चा माजी जिल्हा संयोजक पी.व्ही. सनलकुमार, युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिल घरजाळे, युवा वॉरियर्स जिल्हा संयोजक वैभव कुलकर्णी, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, कामगार मोर्चा अध्यक्ष संदेश बामणे, आयटी सेलचे निखील बोलवले, सोशल मीडिया सेलचे अनिल इंगवले, राकेश चाफेकर, जयश्री भांड, शिंदे, नेत्रा पाठक, शितलकर, अशोक निकम, दीपक मोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, शिवसेनेचे तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे, अशोक धोत्रे, दीपक धोत्रे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन चर्चा केली.



## पेणमध्ये प्रचार रॅलीत घेतला सहभाग

### विजयाचे आवाहन



**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्र. ८मध्ये निघालेल्या भाजप, शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या प्रचार रॅलीत भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थिती दर्शविली आणि उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले.

या रॅलीत नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रितम पाटील, नगरसेवकपदाचे उमेदवार अनिरुद्ध पाटील, जस्विन अमित पाटील यांच्यासह माजी जि.प. सदस्य डी.बी. पाटील, भाजप शहरप्रमुख रवींद्र म्हात्रे, अमित पाटील, सुषमा पाटील, कमलाकर मोकल, सुप्रिया चव्हाण आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा!

### आरक्षणाची मर्यादा पाळण्याचे 'सर्वोच्च' निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नगरपालिका, नगरपंचायत तसेच जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुका ठरलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यास कोणतीही स्थगिती दिली नाही, मात्र या निवडणुका आरक्षणाची ५० टक्के मर्यादा न ओलांडता निवडणुका घ्याव्यात, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ४० नगर परिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर शुक्रवारी (दि. २८) पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला तसेच पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवण्यात आली आहे. दरम्यान, जिथे ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली आहे, तिथले निकाल कोर्टाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन असणार आहेत.

## प्रचारासाठी एक दिवस मुदतवाढ

**अलिबाग :** नगरपालिका निवडणुकीत जाहीर प्रचार करण्यासाठी निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः अपक्ष उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी एक दिवस वाढवून मिळाला आहे.

नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी आता उमेदवारांना १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे. यापूर्वी ही मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत होती. २ डिसेंबर रोजी निवडणुकीसाठी मतदान घेतले जाणार आहे. प्रचाराला वेळ कमी मिळणार असल्याने उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली होती. प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी अर्जासोबतच पक्षांचे एबी फॉर्म दिले होते. निवडणूक चिन्ह निश्चित असल्याने या उमेदवारांनी अर्ज भरताच प्रचाराला सुरुवात केली होती, मात्र अपक्ष उमेदवारांची अडचण झाली होती. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २१ नोव्हेंबर रोजी संपली, पण चिन्हवाटप २६ नोव्हेंबर रोजी करण्यात आले, परंतु आता १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करता येणार असल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे.

## नि व ड क

### थायलंड, श्रीलंकेत पावसाचे थैमान! अनेकांचा मृत्यू; प्रचंड नुकसान

**बँकॉक, कोलंबो :** मुसळधार पावसामुळे आलेल्या भीषण पुरात थायलंड आणि श्रीलंकेचा मोठा भाग पाण्याखाली गेला आहे. थायलंडमध्ये मृतांचा आकडा १४५वर पोहचला असून १२ लाखांहून अधिक कुटुंबं आणि ३६ लाख लोक प्रभावित झाले आहेत. दुसरीकडे श्रीलंकेत पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत ५६ जणांचा मृत्यू झाला असून ६० लोक बेपत्ता आहेत, तर ६००हून अधिक घरांचे मोठे नुकसान झाले आहे.

### 'मिर्झा एक्सप्रेस' फेम विनोदी कवी डॉ. मिर्झा बेग यांचे निधन

**अमरावती :** महाराष्ट्राच्या काव्यक्षेत्रात विनोदी काव्य सादरीकरणाची अनोखी परंपरा घडवणारे आणि 'मिर्झा एक्सप्रेस' अर्थात सुप्रसिद्ध कवी, साहित्यिक आणि हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे शुक्रवारी (दि. २८) पहाटे अमरावती येथे निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून ते मूत्रपिंडाच्या गंभीर आजाराने त्रस्त होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने शोक व्यक्त होत आहे.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे १२वे पर्व

## ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी, सुनील बर्वे यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने होणार सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या १२व्या पर्वाचे यंदा आयोजन करण्यात आले असून महाअंतिम फेरी पनवेलमध्ये रंगणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या वर्षी कलाप्रेमी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्ष असून यानिमित्ताने दोन रंगकर्मींना गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

यामध्ये मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील तसेच रंगभूमीवरील एक अत्यंत मान्यवर, अनुभवी अभिनेत्री व ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि रंगभूमी व सिनेक्षेत्रातील लोकप्रिय कलाकार सुनील बर्वे यांना यंदाच्या गौरव रंगभूमीचा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २८) खांदा कॉलनी येथे पत्रकार परिषदेत दिली.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेसंदर्भात माहिती देण्यासाठी खांदा कॉलनी येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. या वेळी ज्येष्ठ अभिनेते व स्पर्धा समितीचे सदस्य जयवंत वाडकर, स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिनेअभिनेते सुव्रत जोशी, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, अमोल खेर, गणेश जगताप, वैभव बुवा उपस्थित होते. **(पान २ वर..)**

**अटल करंडक एकांकिका स्पर्धा महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाली आहे. ही स्पर्धा दर्जेदार आहे. अशाच स्पर्धेतून आम्ही पुढे आलो आहोत. कलाकारांना वाव देण्याचे काम यातून होत आहे. नव्या पिढीकडे टॅलेंट आणि व्हिजन आहे. महाविद्यालयाच्या थिएटरला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि या स्पर्धेतून दर्जेदार कलाकारांची निर्मिती होत असते. त्यामुळे अटल करंडक कलाकारांसाठी मोठे व्यासपीठ आहे.**

**-जयवंत वाडकर,** ज्येष्ठ कलाकार

**एकांकिकेत वाहवा मिळाल्यानंतर पुढील दिशा मिळत असते. मीसुद्धा एकांकिकांमधून पुढे आलो आहे. यश-अपयशाची चिंता करायची नाही. आपला बेस्ट देण्याचा प्रयत्न करायचा असतो. अटल करंडकमध्ये वयाचे बंधन नाही. त्यामुळे प्रत्येकाला संधी असून हा प्लॅटफॉर्म महत्त्वाचा आहे. अटल करंडकशी जोडलो गेलो याचा मला आनंद आहे. एकांकिकेतून सकारात्मक जाणीव निर्माण होते. नाटकाचे व्यासपीठ बळ देते आणि निरोगी समाज निर्माण करण्याचे काम एकांकिका करते. त्यामुळे एकांकिका ही सकारात्मक कलाविष्कार आणि प्रेरणा देणारी आहे.**

**-सुव्रत जोशी,** सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते

## मुरूडमध्ये शाळांच्या सहलींना 'उधाण'

### विद्यार्थी रमले समुद्रकिनारी!

**मुरूड : प्रतिनिधी**

पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेले मुरूड सध्या विद्यार्थ्यांनी गजबजले आहे. राज्याच्या विविध भागांतील शाळांच्या सहली मुरूड व परिसरात येत असल्याने येथील समुद्रकिनारे बच्चेकंपनीने फुलून गेले आहेत.

मुरूड तालुक्यातील मुरूडसह काशीद, नांदगाव येथील स्वच्छ, सुंदर समुद्रकिनारे शाळकरी मुलांचे प्रमुख आकर्षण असून सागराच्या लाटांचा थरार अनुभव घेण्यासाठी शाळांच्या सहली येथे दाखल झाल्या आहेत. याशिवाय ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांसह शालेय विद्यार्थ्यांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

मोठ्या संख्येने पर्यटक मुरूडमध्ये अवतरले असून सुट्टीचा आनंद घेत आहेत पर्यटकांनी शनिवारपासून वर्दी देण्यास सुरुवात केली. हळूहळू सर्व लॉज फुल झाले तसेच किनारी असणाऱ्या प्रत्येक स्टॉलवर गर्दी पहावयास मिळत आहे. छत्रपती संभाजीनगर, लातूर, परभणी, मुंबई, कल्याण, डोंबिवली, विरार, दहिसर, ठाणे आदी भागातील पर्यटक वीकेण्डला हजर झाले आहेत. हॉटेलमध्ये चविष्ट मासळी खाण्याकडे त्यांचा कल आहे. त्याचबरोबर विविध सागरी खेळ खेळण्यासही पसंती दिली जात आहे.



## पनवेलमध्ये शेकापला गळती सुरूच!

### ज्येष्ठ नेते गणेश शेळके, आशुतोष शेळके यांच्यासह कार्यकर्ते भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच विकासकामांसाठी भाजपच्या नेतृत्वाला विश्वासात घेतले, तर पक्ष पूर्ण ताकदीने तुमच्या सोबत उभा राहील, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आदईतील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते गणेश शेळके, आशुतोष शेळके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या प्रवेशावेळी दिली.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन शेतकरी कामगार पक्षाचे आदई गावातील ज्येष्ठ नेते गणेश शेळके, आशुतोष शेळके यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि. २७) विकासाचे 'कमळ' हाती घेतले. मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेशावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांनी भाजपची शाल देऊन त्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमाला भाजप अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी सरपंच महादू शेळके, भाई पाटील, बाळाराम पाटील, जगदीश शेळके, पद्माकर शेळके, मंगेश भोपी, श्रीचन भंडारी, जनार्दन पाटील, विश्वास काथारा, राजेश काकडे, उद्धव पाटील, आकाश मोकल, श्रीपद शेळके, ज्ञानेश्वर भंडारी, राजनाथ शेळके, कैलास पाटील, प्रवीण पाटील, तेजस म्हात्रे, सूरज म्हात्रे, अनिकेत पाटील, विवेक पाटील, रोहित पाटील, सूरज पाटील, मनोज शेळके आदी उपस्थित होते.

या वेळी शेकापमधून ज्येष्ठ नेते गणेश शेळके, माजी ग्रामपंचायत सदस्य संगीता शेळके, आशुतोष शेळके, तेजस्विनी शेळके, निलेश शेळके, दीपेश शेळके, विकी शेळके, किरण शेळके, संतोष अरुण शेळके, संतोष नारायण शेळके, चिंतामणी शेळके, मयूर शेळके, कबीर शेळके, दत्ता शेळके, चेतन शेळके, प्रणव पाटील, रोहित भोपी, सुनील पाटील, योगेश काकडे, सुनील बेंद्रे, नवनाथ परांगे, विशाल पाटील, राजेंद्र पाटील, अल्पेश शिंदे, आतिष पवार, अक्षय शेळके, रमेश भोगले, रोहन परांगे, विजय विन्हेरकर, अविनाश पाटील, अमित सूर्यवंशी, विकास राजन, विनायक भोपी, कार्तिक खाटपे, करण शेळके, अश्राप खान, रमेश भोगले, अरविंद शाहू, अवधूत मुंडे, विकास शिंदे, प्रदीप म्हात्रे, बाळ वाघमारे, संदीप कोंडेकर, दुर्वेश शिंदे, देवांग शिंदे, ओंकार दापसे, अभिषेक गुरव, **(पान २ वर..)**

# पेणकरांच्या समस्या सोडविण्यासाठी महायुती कटिबद्ध -खासदार धैर्यशील पाटील



**पेण : प्रतिनिधी**

पेण शहर हे मुंबईच्या अगदी जवळपास असून आगामी तिसऱ्या महामुंबईत मोठ्या प्रमाणात नवनवीन प्रकल्प, बाजारपेठ या भागात येणार असून व्यापाराच्या दृष्टिकोनातून जर काही समस्या आल्यास महायुतीच्या वतीने खासदार धैर्यशिल पाटील व आमदार रविशेठ पाटील हे आपल्या पाठीशी राहतील असे वचन खासदार धैर्यशिल पाटील यांनी व्यापारी वर्गाला दिले

पेणमध्ये महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रितम पाटील व प्रभाग २ चे उमेदवार राजेंद्र (राजन) पाटील, पल्लवी कालेकर यांच्या प्रचारार्थ जैन हॉल येथे जैन समाज,गुजराथी समाजातील व्यापारी वर्गाच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस आमदार रविशेठ पाटील, खासदार धैर्यशिल पाटील, भाजप जिल्हा महामंत्री वैकुंठ पाटील, भाजप कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विनोद शहा, प्रभाकर म्हात्रे, भरत पुनमिया, जयंतीलाल पुनमिया, कन्हैय्या पुनमिया, डी. बी. पाटील, विलास मनोरे आदींसह व्यापारी वर्ग व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार धैर्यशिल पाटील यांनी सांगितले कि, भाजप महायुती सरकार व्यापाऱ्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून विविध धोरणात्मक निर्णय घेत असून यामध्ये पेणचा व्यापाऱ्याचे हित कसे जपता येईल त्यांच्यासाठी काय करता येईल हे पाहणे आमचे काम असणार आहे. पेण परिसरात तिसरी मुंबई होत असताना विविध संधी आपल्याकडे चालून येत आहेत.याचा फायदा येथील स्थानिक व्यापाऱ्याला कसा मिळवून देता येईल यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील राहणार आहोत. यासाठी आज येथे आहेत नंतर १० वर्षे येथे नसतील अशा उमेदवारांना निवडून न देता येत्या निवणुकीत आपले उमेदवारांना आपला पाठिंबा द्या असे आवाहन यावेळी खासदार धैर्यशिल पाटील यांनी केले.


यावेळी आमदार रवीशेठ पाटील यांनी सांगितले कि, गेल्या १० वर्षात विविध विकासकामे करून पेण शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम केले. रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचे काम केले. ते काम सुरु असून जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या कामासाठी प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.

यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रितम पाटील यांनी व्यापारी वर्गाला आवाहन करीत गेली अनेक वर्षे व्यापारी वर्ग आमच्या मागे ठाम राहीला असून यापुढे ही आपली साथ राहू द्या असे सांगत येत्या २ तारखेला मला व आपल्या प्रभागातील उमेदवार राजेंद्र पाटील व पल्लवी कालेकर या उमेदवारांना आपले मत देऊन विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रितम पाटील यांनी गेल्या १० वर्षात पेण न. प. च्या माध्यमातून केलेली विकासकामे व आगामी काळात होणाऱ्या विकासकामांची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी कन्हैया पुनमिया, मितेश शहा आदींनी आपले विचार मांडले.



**खोपोली : भाजप, शिवसेना, रिपाइं महायुतीने खोपोली येथे प्रभागानुसार आयोजित केलेल्या लांब पल्ल्याच्या प्रचारफेरीची सांगता झाल्यानंतर भाजप खोपोली पक्ष निरीक्षक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी प्रसिध्दी माध्यमांना दीर्घ मुलाखत देऊन महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाची ग्वाही दिली.. सोबत भाजप अल्पसंख्याक मोर्चा उपाध्यक्ष सय्यद अकबर, नगराध्यक्षपदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते.**



**पनवेल : भाजपा भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी आदर्श युवा मित्र मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना वाराणसी व अयोध्या नगरीची सहल व देवदर्शन करून आणले.**

## खासदार सुनील तटकरे यांच्या आज श्रीवर्धनमध्ये प्रचार सभा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रचाराला आता वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – भारतीय जनता पक्ष युतीचे प्रमुख नेते आणि खासदार मा. श्री. सुनीलजी तटकरे साहेब उद्या श्रीवर्धनमध्ये भव्य कॉर्नर सभांना संबोधित करणार आहेत. नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित या सभांकडे नागरिकांचे विशेष लक्ष लागले आहे.

युतीची ‘आपली निशाणी घड्याळ’ हाका देत खासदार तटकरे उद्या विविध प्रभागांमध्ये मतदारांशी संवाद साधणार आहेत. निर्धारित कार्यक्रम शनिवार, २९/११/२०२५ कसबा पेठ – प्रभाग क्र. ४, ५, ६, सायं ७.२० ते ८.००, शंकर मंदिर, जीवना – प्रभाग क्र. १, २, ३, रात्री ८.१० ते ८.४५, पाच रस्ता – प्रभाग क्र. ८, ९, १०, रात्री ८.५५ ते ९.२०, सरखोत मोहल्ला – प्रभाग क्र. ७, ८, रात्री ९.२० ते १०.०० युतीचे पदाधिकारी, महिला मंडळ, जेष्ठ नागरिक, तरुण कार्यकर्ते आणि सर्व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, खासदार तटकरे आज सभांमध्ये काय बोलणार? निवडणुकीत पुन्हा एकदा सत्ता स्थापन करण्यासाठी युतीचा डावपेच यशस्वी ठरेल का? या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी श्रीवर्धनकरांमध्ये प्रचंड उत्सुकता पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या तोंडावर तटकरे यांच्या उपस्थितीमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

## मध्य रेल्वेला तंत्रज्ञानाचा झटका; बनावट एसी पाससाठी चक्क एआयचा वापर

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मध्य रेल्वेच्या एसी लोकल ट्रेनमध्ये तिकीट तपासणी दरम्यान एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका महिला प्रवाशाने एआयच्या मदतीने तयार केलेला बनावट एसी सीझन पास वापरला. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी महिला आणि तिच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान धावणाऱ्या एसी लोकल ट्रेनमध्ये २६ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजता ही घटना घडली. सकाळी १०:०२ वाजता कल्याणहून सुटणाऱ्या एसी लोकल ट्रेनच्या मधल्या डब्यात तिकीट मागितल्यावर एका



महिला प्रवाशाने तिच्या मोबाईल फोनवर सीझन पास दाखवला. मात्र, पास यूटीएस ॲपऐवजी गुगल क्रोम वेबसाइटवर उघडा होता. टीसीला संशय आल्यावर त्याने क्यूआर कोड पाहण्यासाठी पास खाली स्क्रोल केला, परंतु तो गायब झाला. टीसीने तत्काळ मध्य रेल्वेच्या हेल्पलाइन क्रमांक ५५५३३ वर संपर्क साधला आणि पासवरील क्रमांक पडताळून पाहिला. पडताळणीत तो यूटीएस क्रमांक एका पुरुष प्रवाशाच्या नावावर होता आणि जानेवारी २०२५ मध्ये त्याची मुदत संपली होती. सीएसटीकडून मिळालेल्या डेटाबेस तपशीलांवरूनही महिलेने दाखवलेला पास पूर्णपणे बनावट असल्याचे उघड झाले. हा मोठा घोटाळा असल्याचे टीसीच्या लक्षात आले.

यानंतर महिला प्रवाशाला डोंबिवली रेल्वे स्टेशनवर उतरवून आरपीएफ कार्यालयात नेण्यात आले. चौकशीदरम्यान, हा बनावट सीझन पास पतीने तिला वापरायला दिल्याचे सांगितले. कोडिंग कौशल्य असलेले तिचे पती इंजिनीअर असून, चौकशीत त्याने धक्कादायक माहिती दिली.

त्याने चॅटजीपीटी एआय वापरून रेल्वेच्या एसी गाडीचा सीझन पास तयार केल्याचे कबुल केले. त्यानंतर महिलेला आणि तिच्या पतीला कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात नेण्यात आले. अंबरनाथला (पूर्व) राहणाऱ्या या पती–पत्नीविरोधात भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वीज देयक वसुली मोहीम जोरात; सुट्टीच्या दिवशी वीजबिल भरणा केंद्र राहणार

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या संपूर्ण भांडुप परिमंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या नवी मुंबई, पनवेल क्षेत्रात वीजबिल वसुली मोहीम चालू आहे. यामध्ये, थकबाकी असलेल्या २७ हजार ४९८ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी महावितरणच्या भांडुप परिमंडळाच्या सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्रे सुरु ठेवण्यात येणार आहे.

त्यानुसार शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ व दि. ३० नोव्हेंबर २०२५ या सुट्टीच्या दिवशी परिमंडल अंतर्गत असणारी सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवून बिलाचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी, ग्राहकांनी वीजबिल भरून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

वीज बिल भरणा केंद्र सोबतच महावितरणने वीज बिल भरण्याचे विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. ऑनलाइन वीज बिलाचा भरणा केल्यास १० रुपयांची सूट मिळत आहे. महावितरणच्या संकेतस्थळावर किंवा महावितरणच्या मोबाईल प तसेच ऑफलाइन पर्याय जसे की बँक, खाजगी खात्रीशीर भरणा केंद्रांचा वापर येतो. ग्राहकांनी अखंडित वीज सेवेसाठी उपलब्ध सुविधांचा उपयोग करून चालू व थकीत वीजबिलाचा भरणा करावा, असे आवाहन भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी ग्राहकांना केले आहे.

## पान १ वरुन

### महाडमध्ये उमेदवारांना मार्गदर्शन, नागरिकांच्या घेतल्या भेटीगाठी

यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रभाग क्रमांक ६मधील प्रभात कॉलनी तसेच क्रमांक ७ व ८ येथील उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रतिष्ठित नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या आणि भविष्यातील महाड शहराची भाजपची विकासरचना समजावून सांगून युतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले.

या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य बिपीन महामुणकर, राष्ट्रवादीचे हनुमंत जगताप, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस डॉ. मंजुषा कुद्रीमोती, महाड दक्षिण मंडळ अध्यक्ष निलेश तळवलकर, सुरज बामणे, सुमित पवार, श्रद्धा जोशी, सुनील सोंडकर, संकेत पोरे, संदीप ठोंबरे, शरद, कुद्रीमोती, नमिता जोशी, अक्षय ताडफळे, सुनील सोणकर, शिवाजी दरेकर, आदित्य भाटे, अमोल सुंभे, सुमित पवार, नाना पोरे, दीक्षा शिंदे, राजा नातेकर, नाना महाले, श्रीकांत सहस्त्रबुद्धे, युवराज मुंडे, शशांक महामुणकर, अपूर्वा अवसरे, समृद्धी खोडके, प्रिया खोडके, सोरटताई, माधव रानडे, स्नेहल महामुणकर, बंटी देशमुख आदी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे १२वे पर्व



प्रसारमाध्यमांना पुढे माहिती देताना नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी सांगितले की, पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ५, ६ आणि ७ डिसेंबरपर्यंत या स्पर्धेची अंतिम फेरी होणार आहे. यामध्ये राज्यभरातून प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या अंतिम २५ एकांकिका सादर होणार आहेत. या अनुषंगाने पुणे, कोल्हापूर, नाशिक, जळगाव केंद्राच्या प्राथमिक फेरी झाली असून रायगड, ठाणे, मुंबई केंद्राची प्राथमिक फेरी बुधवारपासून सुरू आहे, ती ३० नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

महाअंतिम फेरीचे उद्घाटन ५ डिसेंबर रोजी, तर पारितोषिक वितरण सोहळा ७ डिसेंबरला मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेच्या अनुषंगाने देण्या येणाऱ्या गौरव रंगभूमीचा पुरस्काराने यापूर्वी ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश बुद्धीसागर, जयवंत सावरकर, डॉ. मोहन आगाशे, सतिश पुळेकर यांना सन्मानित करण्यात आले असून या वर्षी सुप्रसिद्ध अभिनेत्री नीना कुलकर्णी व सुप्रसिद्ध अभिनेते सुनील बर्वे यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील तसेच रंगभूमीवरील एक अत्यंत मान्यवर, अनुभवी अभिनेत्री नीना कुलकर्णी आहेत. नाटक, चित्रपट, दूरदर्शन आणि वेब सिरीज या सर्व माध्यमांत त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे, तर सुनील बर्वे हे सुद्धा मराठी रंगभूमी, दूरदर्शन व चित्रपट क्षेत्रातील एक लोकप्रिय कलाकार आहेत. त्यांची साधी–सरळ भूमिका ते विनोदी, गंभीर, भावनिक अशा विविध प्रकारच्या भूमिका सहजतेने साकारतात. म्हणून ते प्रेक्षकांमध्ये विशेष प्रिय आहेत. त्यामुळे या दोन मान्यवरांना पुरस्कार जाहीर करताना खूप आनंद होत असल्याची प्रतिक्रिया या वेळी परेश ठाकूर यांनी व्यक्त केली.

या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ आणि प्रत्येकी ५० हजार रुपये असे आहे तसेच महाअंतिम फेरीचे परीक्षण रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपट क्षेत्रातील अत्यंत मान्यवर कलाकार म्हणून ओळखले जाणारे आणि सशक्त अभिनयशैली, दमदार आवाज आणि भावपूर्ण मुखअभिनयामुळे ते प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलेले ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक तसेच मराठी टीव्ही आणि रंगभूमीवरील अभिनेत्री व दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, मराठी रंगभूमी, चित्रपट व मालिकांमध्ये काम करणारे अनुभवी अभिनेते सुनील तावडे करणार आहेत.

यात आणखी विशेष म्हणजे प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री त्यांच्या खास शैलीत बहारदार सूत्रसंचालन करणार आहेत, तर बक्षीस वितरण सोहळ्याच्या दिवशी हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रमही होणार आहे. याशिवाय हास्यसम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे हेही आपली विनोदी कला सादर करणार आहेत, असे सांगून उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी देत या वर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय अटल करंडक बहारदार सोहळ्याने अधिक विशेष असणार आहे. त्यामुळे या अटल करंडकाचा जास्तीत जास्त नाट्यरसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकार परिषेदच्या माध्यमातून केले.

या एकांकिका स्पर्धेत राज्यभरातून १००हून अधिक एकांकिकांचा सहभाग असतो. नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला आहे. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढत आहे. हा सांस्कृतिक कट्टा राज्यभर पसरला असून या क्षेत्रातून कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले तसेच अंतिम फेरीचे परीक्षण नाट्य–सिने क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या नजरेतून होत असल्याचेही या वेळी नमूद करण्यात आले.

स्पर्धेचा ब्रँड अँबेसिडर आणि स्वतःचे शीर्षक गीत असलेली ही महाराष्ट्रातील एकमेव एकांकिका स्पर्धा असून यंदाच्या स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते सुव्रत जोशी आहेत तसेच या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक नील ग्रुप, मीडिया प्रायोजक सन मराठी आणि टीआरपी मराठी हे सोशल मीडिया प्रायोजक आहेत, अशी माहिती कार्यवाह श्यामनाथ पुंडे यांनी या वेळी दिली.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरतपणे पुढे जात रहावा यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकीका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धे कडे नेहमीच आकर्षित होतात. देखणे व नेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली असून या स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

***अशी आहेत पारितोषिके***

*प्रथम क्रमांक–एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक–७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक–५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ–दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, लक्षवेधी एकांकिका–३० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, विनोदी एकांकिका–२० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.*

***वैयक्तिक पारितोषिके***

*सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री, लेखक, नेपथ्य, प्रकाश योजना, संगीत यासाठी प्रथम क्रमांक–तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक–दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक–एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ–५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.*

***उत्कृष्ट वेशभूषा*** *(कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ)–एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, अतुल परचुरे सर्वोकृष्ट विनोदी कलाकार–दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्कृष्ट बालकलाकार–एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.*

***प्रत्येक केंद्रावरील सर्वोत्कृष्ट एकांकिका***

*प्रथम क्रमांक–सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक–पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.*

### पनवेलमध्ये शेकापला गळती सुरूच!



हर्ष नागराळे, प्रगती शेळके, मोनिका शेळके, वैशाली साळुंखे, ज्योती मोकाशी, सुखद विन्हेरकर, शोभा चव्हाण, सावित्री गायकवाड, प्रियांका पाटील, त्रिवेणी मोर्या, श्वेता सावंत, सुहासिनी तांबोळी, सविता कोथमिरे, उज्ज्वला चव्हाण, संगीत माने, सुनंदा चव्हाण, छाया भादिगे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत करून नागरिकांपर्यंत पोहचून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा फायदा त्यांना मिळवून द्यावा, असे आवाहन केले.

# पनवेलच्या विचुंबे येथे विकासकामांचा शुभारंभ

## भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : राप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विकासकामे सुरु आहेत. त्यानुसार विचुंबे येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकासनिधीमधून आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रयत्नांमुळे ७० लाख रुपयांच्या निधीमधून अनेक विकासाची कामे करण्यात येणार आहेत. या कामांचे भुमीपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्य हस्ते शुक्रवारी झाले.

विचुंबे ग्रामपंचायत हद्दीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २० लाख रुपयांच्या निधीमधून बाजारपेठ विकास सार्वजनिक दिवाबत्ती आणि विठ्ठल रखुमाई मंदिरा समोरील परिसराचे सुशोभीकरण, ४० लाख रुपयांच्या निधीमधून विचुंबे वरचीआळी वेशी देव ते सिद्धीविनायक सोसायटीपर्यत्तच्या रस्त्याचे कॉँक्रिटीकरण आणि१० लाख रुपयांच्यानिधीमधून ग्रीनव्हॅली ते क्रिस्टल पार्क सोसायटीपर्यत्तच्या रस्त्याचे कॉँक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

या कामांच्या भुमीपूजनावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव,पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, जिल्हा सरचिटणीस यतीन पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकार, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, ग्रामपंचायत सदस्य आप्पा गायकवाड, अनिल भोईर, आर.पी.गायकवाड, प्रगती गोंधळी, श्रावणी भोईर, माजी उपसरपंच रविंद्र भोईर, अविनाश गायकवाड, संजीत भिंगारकर, जी.के,भोईर, धाया दुंदरेकर, जयदास म्हात्रे, परशुराम भोईर, बळीराम भिंगारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

# जास्त व्याजाचे आमिष दाखवणाऱ्यांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

जास्त व्याज दराने उच्च परताव्याबाबत खोटे आमिष दाखवून ३७,७५,५२७/- रूपये लुबाडणाऱ्या एका गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने नोएडा उत्तर प्रदेश येथुन अटक केली आहे .

पनवेल शहरातील ७३ वर्षीय जेष्ठ नागरिकांला रविशंकर मिश्रा उर्फ बी.एल. पटेल, वय ३० वर्षे, रा. रिवा, मध्य प्रदेश यांने आपण ई पी एफ ओ ऑफीस, नवी दिल्ली येथुन बोलत असल्याचे खोटे सांगुन शासनाच्या स्किम मध्ये पैसे गुंतवणुक करून त्यामधुन ७ ते ८ महिन्यात जास्त व्याज दराने उच्च परताव्याबाबत खोटे अमिष दाखवून त्यांच्या ॲक्सीस बँक, व स्टेट बँक ऑफ इंडिया, या दोन वेगवेगळ्या बँकेच्या खात्यामधुन फोन



पेद्वारे वेळोवेळी एकुण रूपये ३७,७५,५२७/- स्विकारून त्यांची फसवणुक केली होती .

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पथकाचे पोलीस उपनिरीक्षक अभय कदम, पोहवा निरज थवई, पोशि विद्याधर गायकवाड,अभय मे-या, पोना प्रवीण पाटील ,मपोशि शितल कोकणी आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे सखोल माहिती घेतली असता सदर आरोपी हा नोयडा, मध्य प्रदेश येथे लपून बसल्याचे आढळून आल्याने त्याठिकाणी सदर सापळारचून अटक केले.

# श्री गुरुचरित्र पारायण सोहळा आणि श्री दत्त जयंती उत्सव

### शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे आज गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजे मजकूर योगीनगर (धोंडळी) परिसरात दरवर्षी प्रमाणे भक्तिभाव आणि अध्यात्मिक उत्साहात 'श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव' आयोजित करण्यात आला आहे. श्री नवनाथ सेवा मंडळ योगीनगर (धोंडळी) यांच्यावतीने आयोजित हा उत्सव स्थानिक भक्तांसह संपूर्ण परिसरातील भाविकांसाठी अनन्यसाधारण आकर्षण ठरत आहे.



या वर्षीच्या महोत्सवात शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर रोजी संगीत, अध्यात्म, भजन आणि प्रवचनांनी युक्त एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्याचा मुख्य आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन व अभंगवाणी सादर होणार आहे. श्री स्वामी समर्थ मठ मंदिराच्या भव्य प्रांगणात संध्याकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा सांगीतिक सोहळा रंगणार आहे.पं. उमेश चौधरी यांच्या सुमधुर गायनाला तबल्यावर प्रसाद पाध्ये, पखवाजावर ॲड. सूरज गोंधळी, हार्मोनियमवर सुप्रिया जोशी, तर टाळ वाद्यावर गुरुदास कदम अशी अनुभवी कलाकारांची प्रभावी साथ लाभणार आहे. कार्यक्रमातील सूत्रसंचालन व निवेदनाची जबाबदारी सोपान आडव सांभाळणार आहेत.

या संगीत कार्यक्रमापूर्वी वातावरण अधिक अध्यात्मिक करणारे दोन विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यामध्ये सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. निवृत्ती महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ५ वाजता बालगोपाल हरिपाठ मंडळ, घोट यांचा हरिपाठ कार्यक्रम होणार आहे. भाविकांच्या मोठ्या उपस्थितीचा विचार करून मंदिर परिसरात आवश्यक त्या सर्व सुविधा, दर्शन व्यवस्थेची उत्तम तयारी केली आहे.

# कळंबोलीत महापालिकेचे अत्याधुनिक शैक्षणिक संकुल उभारण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा आणि कामोठे येथे उभारण्यात येत असलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या अत्याधुनिक शैक्षणिक संकुलाच्या निर्णयाचे स्वागत करत कळंबोली वसाहतीमध्येही अशाच प्रकारचे संकुल उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका विजया कदम यांनी आयुक्त महोदयांना निवेदन देत ही मागणी केली.

त्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, कळंबोली ही श्रमजीवी वसाहत असून येथे माथाडी कामगार, रिक्षाचालक, भाजी विक्रेते तसेच इतर कष्टकरी कुटुंबांची मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. सिडकोच्या एलआयजी, केएल प्रकारच्या घरे तसेच बीयूडीपी योजनेतील इमारतींमध्ये हजारो कुटुंबे वास्तव्यास आहेत. या कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कळंबोली परिसरात खाजगी शाळा असल्या तरी त्यांचे शुल्क सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारे नाही. आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा असल्याने कळंबोलीतही महापालिकेचे शैक्षणिक संकुल उभारणे अत्यावश्यक आहे. वाढती लोकसंख्या, आर्थिक स्तर आणि शैक्षणिक गरज लक्षात घेऊन हा मुद्दा गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी विनंती त्यांनी प्रशासनाकडे केली. या निवेदनाची प्रत आमदार प्रशांत ठाकूर यांनाही पाठविण्यात आली आहे.

# गव्हाण विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

सामाजिक समतेचे अग्रदूत क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी इयत्ता सातवी ब मधील कु.आरोही नाळे हिने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर भाषण केले. वैष्णव देशमुख या विद्यार्थ्यांने महात्मा ज्योतिबा फुले यांची केलेली वेशभूषा लक्षवेधी ठरली त्याच्या हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आले.

विद्यालयातील इयत्ता नववी अ या वर्गाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ह्या अभिवादन सभेस विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव



लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील,मोनाली बाबर,सोनाली घरत,ज्योत्स्ना कोळी व इयत्ता नववी अ चे विद्यार्थी उपस्थित होते.

# वादविवाद स्पर्धेत 'सीकेटी'चे स्पर्धक उपविजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा एज्युकेशन सोसायटीचे पिल्लई कॉलेज नवीन पनवेल येथे २७ नोव्हेंबर रोजी आयोजित इंटर कॉलेज जीनियस इव्हेंट मधील वादविवाद स्पर्धेमध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील कार्तिक सुनील पाठारे व अस्मिता विनोद बोर्डे या दोन्ही विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. पिल्लई कॉलेज तर्फे या विद्यार्थ्यांचा बक्षीस रक्कम, ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ,व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख ,अध्यक्ष अरुण शेठ भगत ,सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, वाणिज्य विभाग सहशिक्षिका अंजली कुलकर्णी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# एटीएम कार्डची अदलाबदल करून लांबवले ४५ हजार

**पनवेल : वार्ताहर**

एटीएम कार्डची अदलाबदल करून ४५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांवर कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मानस समल (रा.तळोजा फेज वन) हे कळंबोली येथील एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले. ते पैसे काढत असताना एटीएम सेंटरमध्ये असलेल्या दोघांपैकी हेल्मेट घातलेल्या एकाने मशीनमध्ये पिन टाकत असताना पिन क्रमांक पाहून घेतला. तसेच यात पैसे नाहीत, असेही त्यांने सांगितले. त्यानंतर चेक करतो, असे सांगत दुसऱ्या इसमाने समल याच्याकडील एटीएम कार्ड पुन्हा मशीनमध्ये टाकले आणि यात पैसे नाही, असे बोलून दोघे निघून गेले. त्यानंतर ४५ हजार रुपये एटीएम सेंटरमधून काढल्याचा मेसेज त्यांना आल्यानंतर त्यांनी जाऊन दोन्ही इसमांचा शोध घेतला, मात्र ते निघून गेले होते.

# पनवेल परिसरात ओपन लॉनवरील विवाह समारंभाला पहिली पसंती

**पनवेल : वार्ताहर**

सध्या लग्नसराईचे दिवस सुरु असून लग्नाचे मुहूर्त जास्त तर हॉलची संख्या कमी झाल्याने आता पनवेल परिसरातील ओपन लॉनवरील विवाह समारंभाला पहिली पसंत सर्वजण देत आहेत .



लग्नसराईत पूर्वीच्या काळी जेवणाची पंगत जमिनीवर त्यानंतर खुर्ची टेबलावर आता मात्र बदलत्या युगात त्याची जागा बुफे पद्धतीने घेतली आहे .लग्न सराईच्या हटके पद्धतीत बुफे पद्धतीला मान देण्यात येत असल्याने ग्रामीण भागात सुद्धा पंगतीच्या जागी बुफे पद्धत जास्त प्रमाणात दिसून येत आहे. त्याच प्रमाणे सभागृहासह ओपन लॉनवर शुभमंगलला पसंती मिळत आहे.

त्या जोडीला संगीतमय मंगलाष्टकांची रेलचेल आहे. बाहेरील बाजूस फोटो सेक्शनसाठी विविध आकर्षक सजावट करण्यात येत असून लग्नसमारंभ हा इन्हेंट ठरत आहे. पूर्वी तुलसी विवाहनंतर खऱ्या अर्थाने लग्न सराईला सुरुवात होत असे व त्यानंतर बाजारपेठांमध्ये लग्नसराईचा साज चढू लागत असे . विवाह समारंभांसाठी लागणाऱ्या विविध वस्तूंच्या खरेदीसाठी पनवेलकर बाजारपेठसह देण्याघेण्याच्या वस्तू साठी मुंबई-दादर, पुणे आदी ठिकाणी जात असल्याने वधूवर कडच्या मंडळींची गर्दी दिसून येत असे . यावर्षी १६ नोव्हेंबरपासून लग्नाचा बार उडण्यास सुरुवात झाली असून ६ मुहूर्त आहेत. डिसेंबरमध्ये २ व ५ रोजी मुहूर्त आहेत तर २०२६ हे वर्ष लग्न आणि शुभ कार्यासाठी खूपच चांगले असल्याचे ज्योतिषांकडून सांगितले जात आहे. २०२६ या वर्षात एकूण ५९ शुभ मुहूर्त आहेत. त्यामुळे या शुभमुहूर्तावर लग्न करणाऱ्यांची संख्या जास्त आहे .

या लग्न सराईसाठी पनवेल परिसरातील सभागृहासह लॉन, हॉटेल व्यवसायिक सज्ज झाले आहेत. सद्य स्थितीत लग्नाचा ट्रेंड बदलत चालल्याने लॉनच्या मोकळ्या जागेत सायंकाळी बहुतांशी लग्न उरकण्यात येत आहे. या ठिकाणी विविध पदार्थ याची रेलचेल असते मोठ्या शहरातील शाही विवाहाची परंपरा ग्रामीण भागात रुजू पाहत असल्याने या ठिकाणी राबणाऱ्या अनेक जणांना सुगीचे दिवस आले आहेत. लग्न सराईमध्ये जेवणावळीमध्ये पंजाबीसह चायनीज पदार्थाची रेलचेल आहे. त्याच्या जोडीला जेवणावळीनंतर पान-मसालासह आईस्क्रीम जोडीला असते मोठ्या शहराप्रमाणे ग्रामीण भागात सुद्धा ही पद्धत जोर धरू लागली आहे.

पंगत बसलाय व वाढायला जेवढा वेळ लागतो त्या पेक्षा कमी वेळात शेकडो माणसे बुफे पद्धतीत जेवण जेवून बाहेर पडत असतात त्याच प्रमाणे बसण्याची आकर्षक रचना असते बुफे कांऊटरवर हवे तसे घेता यते या मुळे ही पद्धत सर्वत्र दिसून येत आहे.सध्या लग्नाचे स्वरूप बदलते होत असून हटके लग्न सराई करण्याकडे अनेकांचा जोर आहे . त्यातच वेगवेगळे इव्हेंट ,संगीत ,संगीत पार्टी आदी प्रकार वाढत चालले आहेत . पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग मैदान तर तालुक्यातील राज रिसॉर्ट , विसावा रिसॉर्ट ,रिहाना फार्म हाऊस , काकाजींनी वाडी ,छाया रिसॉर्ट , आयुष्य रिसॉर्ट आदी कडे विवाह सोहळा करण्याकडे लोकांचा कल असून या ठिकाणी सहा सहा महिने अगोदरच बुकींग करावी लागत आहे .नाविन्यपूर्ण विवाह सोहळा करण्याकडे आता कुटुंबीयांचा कल आहे

# मोबाईलचा एक्सेस घेऊन केली फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

एअरफ्रायरची रद्द झालेल्या ऑर्डरविषयी तक्रार दिल्यानंतर फ्लिपकार्ट या कंपनीचा अधिकारी असल्याचे सांगून व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉलद्वारे मोबाइलचा एक्सेस घेऊन आणि बँक खात्याची माहिती घेऊन ७० हजार १८४ रुपये ट्रान्सफर केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

योगेश प्रभाकर मोहन (कमांडर रेनी सन्स बिल्डिंग, नेरे) यांनी फ्लिपकार्टवर एअरफ्रायरची ऑर्डर दिली. त्यांनी गुगल पेवरून पेमेंट पाठवले. त्यांची ऑर्डर अचानक रद्द झाली. यावेळी त्यांनी एक्स वेबसाईटवरील अकाउंटवरून फ्लिपकार्टच्या वेबसाईटच्या नावे तक्रार करून फ्लिपकार्ट यांना टॅग केले. त्यानंतर संपर्क केला असता व्हिडिओ कॉल करून ॲप दाखवण्यास सांगण्यात आले. व्हॉट्सॲप वरून व्हिडिओ कॉल आल्यानंतर त्यांना स्क्रीन शेअर करण्यास सांगून स्क्रीन शेअरचा एक्सेस घेत फ्लिपकार्ट ओपन करून दाखवले.

ॲप ओपन केल्यानंतर दोनशे रुपयापर्यंतचे दोन प्रॉडक्ट ऑर्डर करण्यास सांगून ते पुन्हा रद्द करण्यास सांगितले, त्यानंतर रिफंड झालेली रक्कम खात्यात जमा झाली का, हे पाहण्यासाठी बँकेचे ॲप ओपन करण्यास सांगितले. त्या वेळी बैंक अकाउंट व डेबिट कार्ड डिटेल टाकण्यास सांगितले. डिटेल दिल्यानंतर दोनशे रुपये जमा होण्याऐवजी त्यातून ७० हजार १८४ रुपये ट्रान्सफर झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुन्हा दाखल करण्यात आला.

# खारघर, तळोजात घरफोडी; ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील खारघरसह तळोजात झालेल्या घरफोडीत लाखोंचा मुद्देमाल लंपास झाल्याची घटना घडली आहे . तळोजा उपनगरातील फेस १ येथील सेक्टर १५ मधील पार्वती होम्स या इमारतीमध्ये मध्यरात्री चोरट्यांनी दोन घरफोड्या करून लाखोंचा मुद्देमाल पळवला आहे.

ही चोरी मध्यरात्री दोन ते पहाटे सहा वाजण्याच्या दरम्यान झाली आहे . यात सेक्टर १५ येथील पार्वती होम्स या इमारतीमधील २०१ आणि २०२ या सदनिकांना चोरट्यांनी लक्ष्य केले. उघड्या गॅलरीमधून चोरटे घरात शिरले. तळोजातील या दोन्ही सदनिकांतून दोन लाखांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरला असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे

# प्रमिला पाटील यांचा वाढदिवस लहानग्यांसोबत आश्रमात साजरा



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी सभपती प्रमिला रविशेठ पाटील यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. आनंद फक्त स्वत:पुरताच न ठेवता तो समाजातील गरजूंनाही मिळावा या भावनेतून त्यांनी हा दिवस संत गोल्ड किंग आश्रमातसाजरा करण्याचे ठरवले . आश्रमात पोहोचताच मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेलं निरागस हास्य हा दिवस अधिकच संस्मरणीय करून गेलं. वाढदिवसाचा केक कापताना मुलांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला. मुलांना भेटवस्तू देताना त्यांच्या डोळ्यांत चमकणारा आनंद हा त्या क्षणाचा गोडवा ठरला.

## संपादकीय

# निवडणुकांचा मार्ग मोकळा

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण लागू केल्यामुळे ५७ ठिकाणी ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती दिली जाईल अशी शक्यता वर्तवली जात होती, परंतु या संदर्भात शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या अंतरिम सुनावणीत या निवडणुका पुढे ढकलण्यात येणार नाहीत असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याने या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.

**सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या अंतरिम निकालाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरील टांगती तलवार दूर झाली आहे. आधीच उशीर झालेल्या या निवडणुका आणखी थांबवता येणार नसल्याचे न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे ठरलेल्या नियोजनानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील हे स्पष्ट झाले आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याची परवानगी दिली असली तरी हे प्रकरण तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला असून पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवली आहे. ज्या नगरपरिषदा, नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली आहे अशा ठिकाणी या निवडणुकांच्या माध्यमातून लागलेले निकाल हे जानेवारीत सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीतून येणाऱ्या निकालावर अवलंबून असतील असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. म्हणजेच निकाल विरोधात गेल्यास या मतदारसंघांमधले निकालदेखील रद्द केले जाऊ शकतात. राज्यातील ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याचे राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयाला सांगितले होते. त्यामुळे या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती दिली जाईल अशी शक्यता वर्तवली जात होती व म्हणूनच शुक्रवारच्या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. न्यायालयात शुक्रवारी झालेल्या सुनावणीमध्ये बांठिया आयोगाच्या शिफारशींचा मुद्दा प्रामुख्याने चर्चिला गेला. बांठिया आयोगाच्या शिफारशींनुसार ओबीसींना २७ टक्के आरक्षण देताना कोणत्याही ठिकाणी एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या वर जाणार नाही याची काळजी घेतली जावी असे स्पष्ट करण्यात आले होते. परंतु ओबीसींना लागू केलेल्या सरसकट २७ टक्के आरक्षणासह इतर समाजांच्या आरक्षणामुळे एकूण आरक्षणाची मर्यादा काही ठिकाणी ५० टक्क्यांच्या वर गेली. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या अंतरिम निकालामध्ये महानगरपालिका निवडणुकांची कोणत्याही विलंबाशिवाय घोषणा केली जावी असेही म्हटले आहे. राज्यातील फक्त दोन महानगरपालिकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असून तिथे आरक्षणाची सोडत आणि आरक्षणाची मर्यादा यासंदर्भात पुनर्विचार करण्याबाबत न्यायालयाने निर्देश दिले. जर काही ठिकाणी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली तर तिथले निकाल देखील जानेवारी महिन्यात होणाऱ्या सुनावणीच्या आदेशावर अवलंबून असतील असे न्यायालयाने स्पष्ट केले. ज्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत आहे अशा ठिकाणी या आधीच्या निर्देशानुसार निवडणुका घेतल्या जाव्यात असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. म्हणजेच ज्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर असेल तिथे आरक्षण सोडतीबाबत निवडणूक आयोगाला पुन्हा काम करावे लागण्याची शक्यता आहे. मर्यादा ओलांडली गेल्यास सर्वोच्च न्यायालयात जानेवारीत होणाऱ्या सुनावणीच्या निकालावर तेथील निकाल अवलंबून असतील. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्याचा निवडणूक आयोग सक्रिय झाला असून जिथे जास्त आरक्षण कोटा असेल तिथे पुन्हा सोडत करण्यात येणार असल्याचे समजते.**

# अतिक्रिकेटमुळे होतेय तारांबळ, वेगवेगळ्या चमूंची गरज

परत एकदा दुसऱ्या कसोटीमध्ये दक्षिण आफ्रिकेकडून आपल्या भारतीय क्रिकेट चमूचा दारुण पराभव झाला. असे वाटले होते की भारतीय क्रिकेट चमू कमबॅक करेल, पण आपल्या सर्व १४० कोटी जनतेच्या आशेवर पाणी फेरले गेले. याला करणे कदाचित वेगवेगळी असतीलही. सध्या खूप मोठ्या टीकेच्या झोड उठत आहे आणि हे साहजिक आहे, कारण आपल्या भारत देशात क्रिकेटवर प्रेम करणारे पूर्वीपासून फार अधिक आहेत.

पूर्वी फार क्रिकेट खेळले जात नसे, जे पण खेळले जात होते ते देशासाठी खेळले जात होते. त्यात कसोटी क्रिकेट आणि वनडे क्रिकेटचा अंतर्भाव होता आणि संपूर्ण लक्ष्य ह्या दोन खेळांवर राहायचे आणि हीच प्राथमिकता ही सर्वांची होती, परंतु आता तसे नाही. जेव्हा पासून आयपीएलचा उदय झाला तेव्हापासून भारतीय क्रिकेटचा चेहरामोहराच बदलला. आता प्राथमिकता ही आयपीएलला दिली जाते. कारणही तसेच आहे ते म्हणजे पैसा आणि प्रसिद्धी. एकवेळ क्रिकेट खेळाडूला कसोटी क्रिकेट किंवा वनडे क्रिकेटमध्ये वर्णी नाही लागली तर वाईट वाटणार नाही, परंतु त्याचे आयपीएल खेळणे हे प्राधान्य आणि स्वप्न असते. इथे कुठेतरी देशाभिमान कमी पडतो आहे असे दिसते आहे.

दुसरे कारण हे आहे की क्रिकेट हे अति झाले आहे. सतत क्रिकेटचा हंगाम सुरु असतो. त्यामुळे क्रिकेटपटूंवर शारीरिक आणि मानसिक अधिक ताण पडतो आहे आणि ह्याच कारणांमुळे आपल्या भारतीय क्रिकेट टीमने सध्या जबरदस्त मार दक्षिण आफ्रिकेकडून खाल्ला आहे.

सध्याचे युग हे जलद युग, वेगवान युग आहे. सर्वांना अगदी फास्ट हवं असतं. प्रत्येक प्रकारात अति गती निर्माण झाली आहे. पूर्वीपासूनच क्रिकेट हे फार मोजकेच देश खेळायचे, कारण हेच होते की ह्या खेळाला पाच दिवस लागतात, हा खेळ खूपच रटाळ आहे, कंटाळवाणा आहे. आता ह्या खेळातपण गती आली आहे. वनडेवरून हा खेळ २०-२०पर्यंत आला. जसा हा खेळ वेगवान झाला त्याला प्रसिद्धी निर्माण झाली, त्यात गोडी निर्माण झाली. हा खेळ खूपजणांना आवडू लागला आहे. या धकाधकीच्या युगात मूळ कसोटीचा खेळ कुठे तरी मागे राहून गेला आणि आता क्रिकेट म्हणजे वनडे किंवा २०-२० हेच समजू लागलो. आता तर वनडेसुद्धा कंटाळवाणे होऊ लागलेत. आता फक्त २०-२०लाच अधिक पसंदी दिल्या जात आहे. ह्या २०-२०चे लोक अक्षरशः खूप दिवाने झाले आहेत.

अगोदर दोन इंनिंग्जसचा खेळ असायचा. आता सगळीकडे मर्यादित षटकांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे प्रत्येक क्रिकेट खेळाडूला आपले स्थान निश्चित ठेवण्यासाठी जलद गतीनेच क्रिकेट खेळावे लागत आहे. मुळात त्याला आता संयमाच राहिलेला नाही. संपूर्ण क्रिकेट आता बदललेले आहे. कालपर्यंत आपली विकेट वाचविण्यासाठी क्रिकेट खेळले जात होते. आता मात्र प्रत्येक चेंडू हा चौकार किंवा षटकार मारण्यासाठी खेळला जातो. कालपर्यंत आपण आऊट तर होणार नाही ही भीती होती. आता मात्र फक्त फटाके मारणे हाच प्रकार राहिलेला आहे.

अगोदरपासूनच सर्व प्रकारात साधारणतः एकच टीम असायची. एखादा दुसरा बदल झाला तरच नाही तर मग टेस्ट, वनडे आणि २०-२०ला मात्र एकच टीम असायची. आता ह्या सर्व प्रकारात मात्र क्रिकेटपटूंची बरीच दमछाक व्हायला दिसते आहे. पूर्वी एव्हढा क्रिकेटचा सिझन नसायचा. आता मात्र बरेच सिझन असतात. ह्या तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळायचे म्हणजे एक टीम असल्यामुळे बराच ताण खेळांडूवर येतांना दिसत आहे. त्यांची एकग्रहता सुद्धा भंग पावते. त्यांना स्विच ओव्हर करायला कठीण जातं. ह्यात बरेच खेळाडू बऱ्याचदा गोंधळलेले आपल्याला आढळून येतात. कधी कधी चाटपटत असतात.

हल्ली बरीच मुलं क्रिकेट खेळायला लागली आहेत. अगदी शालेय जीवनापासून शालेय स्पर्धा आणि अकॅडमीत सुद्धा खेळताना दिसत आहे. पालक आणि मुलं दोघे पण ह्या खेळात रुची घेत आहे. लोकांमध्ये एक जागरूकता क्रिकेट विषयी आली आहे. काही तर करिअर सुद्धा ह्यात निवडण्याचे धाडस करीत आहेत. आता ग्रामीण भागात खेडोपाडी क्रिकेट गेले आहे आणि ज्यांना ज्यांना संधी मिळाली आहे त्यांनी संधीचे सोने केले आहे. ग्रामीण भागात खूपच खेळांडूमध्ये गुणवत्ता आढळत आहे.

आपला देश १४० कोटी लोकसंख्येचा आहे. ह्यातून अकरा खेळाडूंची निवड करणे म्हणजे खूपच कठीण आणि जटील आहे. ह्यात खूप स्पर्धा निर्माण झाली आहे. अगोदर पण होतीच, पण आता फार अवघड असे काम झाले आहे. बरेच खेळाडूंचे स्वप्न प्रतीक्षा पाहूनच स्वप्न स्वप्नच राहिलेले आहे. अनेक खेळाडूमध्ये गुणवत्ता असूनसुद्धा प्रतीक्षा करून करून त्यांचे आयुष्य गेलं आहे.

आपल्या भारत देशाने क्रिकेटविश्वात खूप मोठी प्रगती केली आहे, नाव कमविले आहे. खरोखर त्यांची प्रगती प्रशंसनीय आहे. खरोखर आपल्या भारत देशाला प्रगती करायची असेल, अपराजित राहायचे असेल तर भारताच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये वेगवेगळ्या टीम असल्या पाहिजे. ह्या तिन्ही चमू आपापल्या प्रकारात अगदी निष्णात असतील. जसेकी, कसोटीवाली टीम, वनडेवाली टीम आणि २०-२०वाली टीम.

कसोटीवाली कसोटी खेळेल, वनडेवाली टीम वनडे खेळेल आणि २०-२०वाली २०-२० खेळेल. म्हणजे सध्या एकाच टीमवर ताण पडणार नाही. त्यांना स्विच ओव्हर करण्यामध्ये त्रास होणार नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे तिन्ही टीम मिळून किमान ३६ खेळाडू तयार असतील. त्यांना टॅलेंट दाखविण्यासाठी संधी मिळेल. सोबतच तरुणाईला चांगला रोजगारसुद्धा मिळेल.

**-अरविंद मोरे, नवीन पनवेल**

## अंतरहृदयी शाल्मली

शाल्मली म्हणजेच काटे सावर. या झाडाच्या खोडाला त्रिकोणी आकाराचे काटे असतात. अत्यंत सरळ वाढणाऱ्या झाडाच्या फांद्या कोनासारख्या असतात. फांद्यांच्या टोकाला फक्त छोटी-छोटी पानं असतात. लाल रंगाची फुलं येतात तर छोट्या बोंडातून आखूड रेशमी कापूस बाहेर पडतो.

जानेवारीत सावर बहरते तीही निष्पर्ण अवस्थेत. विशेष म्हणजे सावर कमी पाणी असलेल्या प्रदेशात वाढणारं झाड आहे. काही माणसंसुद्धा सवारीसारखी बाहेरून काटेरी व कडक, काहींच्या मते भांडखोर. सतत कोणत्यानाकोणत्या कारणावरून वाद घालणारी, पण या माणसांच्या आत कधी डोकावून पाहिलं तर लक्षात येईल की, आतून ही माणसं मेणासारखी मऊ असतात. परिस्थितीनुसार या माणसांनी आपल्या स्वभावाला काटे धारण केलेले असतात.

सवरीचे काटे ज्याप्रमाणे तिचं संरक्षण करतात तसंच या काटेरी माणसांचा स्वभाव त्यांचं समाजातील इतर प्रवृत्तीपासून संरक्षण करत असत. त्यांचा भांडखोरपणा त्यांचं सुरक्षा कवच असतं. कधीतरी अशा माणसांच्या अंतर्मनात डोकावून पहावं. मग तुमच्या लक्षात येईल की बाह्यरूप आणि अंतररूप यामध्ये किती विरोधाभास आहे ते जणू दोन टोकं.

सावर बाहेरून कडक-काटेरी असली तरी आतून मात्र ठिसूळ असते. ही माणसंसुद्धा अशीच असतात आतून भावूक आणि तितकीच सौम्य. आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचचा मेंदूपेक्षा मनानी विचार करणारी. सावरीच्या झाडाची पान खूप तुरळक व फांद्यांच्या टोकाला असतात. तशीच ही माणसंसुद्धा खूप तुरळक असतात. यांच्या सुखाच्या कल्पना इतरांपेक्षा खूप निराळ्या असतात.

सावरीची लाल रंगाची फुलं मखमली फुलं मन मोहून घेतात तसंच या माणसांमध्ये एखादा असा गुण असतो जो इतरांना मोहीत करतो. होळी सणाला जाळण्यासाठी सवरीचं लाकूड उभं करतात तशीच ही माणसं दुसऱ्याच्या सुखासाठी- आनंदासाठी झटत असतात. म्हणून अशी माणसं वाट्याला आलीच तर त्यांच्या अंतरंगात डोकावून पहावं. मेणाहूनही मऊ असलेली प्रेमानं, मायेनं, आपुलकीनं ओतप्रोत भरलेली ही माणसं तुम्हाला हवीहवीशी वाटतील. त्यांच्या भावविश्वात जर तुम्हाला जागा मिळावी, तर ही माणसं स्वतःचा जीवसुद्धा काढून द्यायला कमी पडणार नाहीत.

सूर्योदय-सूर्यास्त होताना सवरीच्या झाडातून तो पहिला तर अधिक विलोभनीय वाटतो. सावरीच्या कोनात असलेल्या फांद्या,त्याच्यावर रक्तरंजीत लाल फुलं आणि समोर उगवणारा किंवा अस्ताला जाणारा सूर्य एखाद्या दीपमाळेप्रमाणे हे चित्र असतं.

कुणीतरी म्हटलंय...
आयुष्य सुंदरच असतं
दृष्टिकोन वेगळा असतो
जसं पहावं तसंच दिसतं.
तसंच मलाही वाटतं,
सावरीसारखी वाटणारी
माणसंसुद्धा
चांगली असतात फक्त
त्यांना ओळखण्याची दृष्टी
तुमच्याकडे हवी....

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**



## बदलते तंत्रज्ञान

# ट्रेनमध्ये प्रवास करताना नेटवर्क का जाते? जाणून घ्या

ट्रेनने प्रवास करणे ही भारतीयांच्या रोजच्या सवयीचा भाग आहे. लांबचा प्रवास असो वा छोटा, ट्रेनमध्ये बसून मोबाईलवर इंटरनेट वापरणे, व्हिडीओ पाहणे किंवा कॉलिंग करणे आपल्याला आवडते. पण, ट्रेनने वेग पकडला की, मोबाईल नेटवर्क गायब होणे किंवा इंटरनेटचा स्पीड मंदावणे, हा नेहमीचा अनुभव आहे. ही समस्या नेमकी का येते आणि यावर मात कशी करायची, याबद्दलची माहिती सोप्या भाषेत जाणून घेऊया...



ट्रेनचा वेग, रेल्वेमार्ग ग्रामीण भागातून जाणे आणि ट्रेनची मेटल बॉडी ही तीन प्रमुख कारणे आहेत, ज्यामुळे प्रवासादरम्यान नेटवर्कची समस्या उद्भवते. ट्रेनच्या आतून रेडिओ सिग्नल अडवले जातात तसेच एकाच वेळी अनेक प्रवासी डेटा वापरत असल्याने इंटरनेट स्पीड मंदावतो, मात्र काही सोप्या उपायांनी तुम्ही तुमच्या प्रवासात नेटवर्कची समस्या कमी करू शकता.


तुमच्या फोनमध्ये जरी नेटवर्क बार्स दिसत असले तरी इंटरनेटचा वेग खूप कमी असतो. याचे कारण 'लोड' आहे. एकाच ट्रेनमध्ये शेकडो लोक एकाच वेळी मोबाईल डेटा वापरत असतात. यामुळे जवळच्या टॉवरवर अचानक खूप जास्त डेटाचा लोड येतो. या वाढलेल्या लोडमुळे टॉवरची क्षमता कमी पडते आणि इंटरनेटचा वेग आपोआप मंदावतो. हाय-ट्रॅफिक असलेल्या मार्गांवर ही समस्या अधिक असते.

ट्रेनमध्ये १००% परफेक्ट नेटवर्क मिळवणे अवघड असले तरी, खालील काही टिप्स तुम्हाला नक्कीच मदत करू शकतात.

खिडकीजवळ बसा: शक्य असल्यास खिडकीजवळ बसण्याचा प्रयत्न करा, कारण यामुळे ट्रेनच्या मेटल बॉडीचा सिग्नलवरील अडथळा कमी होतो. चांगले नेटवर्क निवडा: प्रवासाला निघण्यापूर्वी तुमच्या मार्गावर Airtel, Jio किंवा BSNL यापैकी कोणत्या नेटवर्कची कव्हरेज चांगली आहे, ते तपासून पाहा आणि तोच नेटवर्क वापरा. ऑफलाइन कंटेंट: प्रवासाला निघण्यापूर्वी व्हिडिओ, चित्रपट किंवा पुस्तके ऑफलाइन डाउनलोड करून ठेवा, जेणेकरून वेळेचा सदुपयोग होईल. वाय-फाय कॉलिंग: जर स्टेशनवर किंवा ट्रेनमध्ये मोफत वाय-फाय उपलब्ध असेल, तर तुमच्या फोनमध्ये VoWiFi हे फीचर ऑन ठेवा. यामुळे वाय-फायच्या मदतीने तुमचे कॉल अधिक स्पष्ट होतील.

# उद्योगपती जे.आर.डी. टाटा

## निमित्त



पॅरिसमध्ये २९ जुलै १९०४ रोजी जन्मलेले जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा हे भारतात नागरी विमान सेवेचा पाया घालणारे पहिले द्रष्टे उद्योगपती, वैमानिक! त्यांचा आज स्मृतीदिन आहे. उद्योगपती रतनजी दादाभॉय टाटा हे त्यांचे वडील आणि त्यांच्या आईचे नाव होते सुझान ब्रीअरे. त्या फ्रेंच होत्या. रतनजी टाटा हे टाटा उद्योगसमूहाची स्थापना करणाऱ्या सर जमशेदजी टाटा यांचे चुलत बंधू होते. 'जेआरडी' यांची आई ही भारतात १९२९मध्ये कार चालवणारी पहिली महिला होती. जे.आर. डी. टाटा हे देशातील पहिले परवानाधारक वैमानिक होते.

टाटा उद्योगसमूहातील अनेक नव्या उद्योगांचा पाया 'जेआरडीं'नी घातला. यामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा मोटर्स, टायटन इंडस्ट्रीज, टाटा टी, व्होल्टास आणि देशातील पहिली विमान कंपनी एअर इंडिया यांचा समावेश आहे. फ्रान्स, लंडन, जपान आणि भारतात त्यांचे शिक्षण झाले. १९२५मध्ये त्यांनी 'टाटा सन्स'मध्ये बिनपगारी अॅप्रेंटिस म्हणून आपली कारकीर्द सुरू केली आणि १९३८मध्ये वयाच्या ३४व्या वर्षी ते 'टाटा सन्स'चे अध्यक्ष बनले होते. स्टील, रसायने, ऊर्जा, वीज, अभियांत्रिकी आणि आतिथ्यशीलता या क्षेत्रात त्यांना अधिक रस होता. त्यामुळे या क्षेत्रातील अनेक उद्योगांचा पाया त्यांनी घातला. उद्योगात मूल्य आणि तत्त्वे यांचा पाया बळकट करून त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा आदर्श जगासमोर उभा केला. टाटा म्हणजे विश्वासार्हता, हे समीकरण जनमानसात रुजवण्यात 'जेआरडीं'चे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली टाटा समूहाने आपली उलाढाल १०० दशलक्ष अमेरिकी डॉलरवरून पाच अब्ज डॉलर्सच्या पुढे नेली.

८८व्या वर्षापर्यंत कार्यरत असलेल्या 'जेआरडीं'च्या नेतृत्वाखाली टाटा समूहाच्या कंपन्यांची संख्या ९५ झाली होती. सर दोराबजी टाटा ट्रस्टचे ते अध्यक्ष होते. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९४१मध्ये टाटा मेमोरिअल सेंटर हे कर्करोगावर उपचार, संशोधन करणारे आशियातील पहिले रुग्णालय उभे राहिले. १९३६मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, १९४५मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि राष्ट्रीय सादरीकरण कला केंद्र या संस्थांची स्थापनाही 'जेआरडीं'नी केली. १९४५मध्ये टाटा मोटर्सची स्थापनाही त्यांनी केली. १९३२मध्ये त्यांनी टाटा एअरलाइन्स ही स्वतःची विमान कंपनी स्थापन केली. नंतर तिचे राष्ट्रीयीकरण करून ती एअर इंडिया झाली. 'जेआरडी' २५ वर्षे या कंपनीचे अध्यक्ष होते. देशात सर्वोत्तम हवाई वाहतूक सेवा देण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या योगदानाची दाखल घेऊन त्यांना मानद एअर कमोडोरपद देण्यात आले होते. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले होते.

१९५५मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. देशाच्या प्रगतीतील त्यांचे योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च मानाच्या नागरी पुरस्कारानेही सन्मानित केले होते. या महान, द्रष्ट्या उद्योजकाचा १९९३मध्ये वयाच्या ८९व्या वर्षी २९ नोव्हेंबर १९९३ रोजी जीनिव्हामध्ये मृत्यू झाला.

**(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात थंड पाण्याने अंघोळ करणे कितपत योग्य?

थंडीचा कडाका येत्या काही दिवसातच सुरू होईल. थंडीच्या कडाक्यात सकाळी अंघोळ करणे म्हणजे युद्धावर जाण्यासारखं अनेकांना वाटतं. हिवाळ्यात सकाळी पाण्यात हात टाकावा वाटत नाही. कारण अनेकांच्या पाण्याच्या टाक्या या गच्चीवर असतात आणि हिवाळ्यात यातील पाणी अत्यंत थंड होते. मग अशावेळी हिवाळ्यात थंड पाण्याने अंघोळ करणे योग्य आहे की गरम पाण्याने अंघोळ करणे फायद्याचे आहे, असा प्रश्न अनेकांना सतावतो. तज्ज्ञांचा काय आहे सल्ला?



थंडीत गरम पाण्याने अंघोळ करण्याचे सूख काही औरच असते. गरम पाण्याने अंघोळ केल्याने काही काळ थंडी दूर होते. शरिरातील स्नायूंना आराम पडतो. रक्त प्रवाह सुधारतो. एकदम फ्रेश वाटल्यासारखं वाटतं. गरम पाण्याच्या वाफेमुळे नाक मोकळं होतं. या गरम पाण्याच्या गुळण्या केल्या तर घसाही साफ होतो. त्यामुळे हिवाळ्यात अगोदर गरम पाण्याने अंघोळ करण्याचा अनेकांचा आग्रह असतो. इंटरनॅशनल जर्नल ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड इंजिनिअरिंग डेव्हलपमेंटच्या एका अहवालानुसार अत्यंत उष्ण पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेचे नुकसान होऊ शकते. यामुळे त्वचेवरील नैसर्गिक तेल कमी होते. कोरडेपणा, शुष्कपणा वाढतो आणि मग त्वचेची आग होते. खाज सुटते.

थंडीच्या दिवसात थंड पाण्याने अंघोळीचा विचारच अंगावर काटा आणतो, पण थंड पाण्याने अंघोळ केल्यास शरीर सक्रिय होते. रक्ताभिसरण वाढते. यामुळे प्रतिकार शक्ती वाढते. कारण पांढ्या पेशी लवकर सक्रिय होतात, पण हिवाळ्यात अति थंड पाण्याने अंघोळ केल्यास शरीराला धक्का बसतो. यामुळे रक्तवाहिन्यांवर परिणाम होतो. यामुळे रक्तदाब वाढतो. हृदयाची गती वाढते. एकदम थंड पाण्याने अंघोळ करणे टाळणेच योग्य असते. काटमोड पाण्याने अंघोळ करणे चांगले आहे. अथवा अंघोळीपूर्वी जर तुम्ही व्यायाम करत असाल तर शरीर गरम होते आणि त्यात घरातील साध्या पाण्याने अंघोळ केल्यास तितका त्रास होत नाही. काहींना थंड पाण्याने अंघोळ केल्यास सर्दी-ताप असा त्रास होऊ शकतो.

जर बाहेर एकदम थंडगार वातावरण असेल आणि छतावरील अति थंड पाण्याने तुम्ही अंघोळ करत असाल तर मग हा शहाणपणा ठरत नाही. अशावेळी हट्ट न करता कोमट अथवा काटामोड गरम पाण्याने अंघोळ करणे चांगले राहते. यामुळे त्वचाही नरम राहते तसेच सर्दी-पडसं, पायात गोळे येणे अथवा इतर आजार उद्भभवत नाहीत.

# माथेरानमध्ये ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची गरज



**माथ माथेरान : बातमीदार**

माथेरान शहरात ई-रिक्षा सुरू झाल्यापासून पर्यटकांची संख्या वाढली आहे.मात्र निवडणूक कामासाठी सात ई -रीक्षा राखीव ठेवल्याने नागरिकांची आणि पर्यटकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

माथेरानमध्ये सध्या नगरपरिषदेच्या निवडणुका सुरू आहेत.निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी २० पैकी ७ ई-रिक्षा घेतल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी, रुग्ण, पर्यटक आणि स्थानिकांना मोठी गैरसोय होत आहे. ४ ई-रिक्षा दुरुस्तीसाठी गेल्यामुळे फक्त ९ ई-रिक्षा उपलब्ध आहेत. एकदा बॅटरी डिस्चार्ज झाली की रिचार्ज करण्यासाठी ३ ते ४ तास लागतात. स्थानिक लोक खूप नाराज आहेत कारण ई-रिक्षां सुरु होण्यापूर्वी निवडणूक कर्मचाऱ्यांना टॅक्सी स्टॅंडवरून चालत जाण्यासाठी कधीही कोणतीही अडचण येत नव्हती. आता फक्त वाहतुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ७ ई-रिक्षा घेतल्यामुळे सेवा देण्यात अडचणी येत आहेत .

नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष मनोज खेडकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र ठाकूर यांच्याशी बैठक घेतली आहे. सर्व कर्मचारी सोमवारी आदल्या दिवशी माथेरानला पोहोचतील कारण ते कर्तव्यावर असतील आणि निवडणूक संपेपर्यंत वाहनांची आवश्यकता लागणार नाही.अश्या परिस्थितीत ई- रीक्षा ऑफिस समोर उभ्या ठेवण्यापेक्षा प्रवाशांना द्याव्या अशी मागणी केली आहे.मंगळवार २ डिसेंबर रोजी मतदान असून किमान आठशे मतदार हे माथेरान बाहेरून मतदाणासाठी गावात येणार आहेत यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे त्यामुळे त्यांना प्राधान्य मिळाले पाहिजे असे खेडकर यांनी सांगितले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार एल आर व्यंकटरमण, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील**
**मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| २२/१ | १ | ०-५८-०० | ०-०३-८० | ०-६१-८० पैकी ०-३७-०० | १३.३१ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २८/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**

**कार्यालयीन पत्ता**
**गाळा क्रं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**संपर्क :- ८८८८२७१७५९**

# आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**नागोठणे : बातमीदार**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागातर्फे महाविद्यालयात प्राचार्य प्रा. डॉ. दिनेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संविधान दिन विविध प्रकारचे कार्यक्रम राबवुन साजरा करण्यात आला

सकाळी ९:३० वा. प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांनी भारतीय संविधानाचे महत्व सांगितले. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान आहे. आपल्याला संविधानाने समता, स्वातंत्र्य न्याय व बंधुता ची शिकवण बहाल केली आहे. आपल्याला जे मुलभूत अधिकार दिले आहेत त्यानुसार सर्व स्तरातील लोक आपापल्या परंपरा व संस्कृती जपत आहेत.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान उद्देशिकाचे वाचन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.

## उरण नगरपरिषद, उरण

ता. उरण, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०० ७०२
Email ID : municipalcounciluran@gmail.com

जा.क्र.: उनप/निवडणूक/२०२५-२०२६/०३०४ दिनांक :- २८/११/२०२५

**उरण नगरपरिषद, सार्वत्रिक निवडणूक २०२५ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहीर झाल्याबाबत.**

### जाहीर सूचना

उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ कामी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१७६ दि.२६ नोव्हेंबर, २०२५ अन्वये मंगळवार दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजी मतदानाच्या दिवशी उरण नगरपरिषद मतदार संघातील शासनामार्फत सार्वजनिक सुटटी जाहीर करण्यात आलेली आहे. सदरची सुट्टी उरण नगरपरिषद हददीतील राज्यशासन व केंद्रशासनाच्या शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम/महामंडळे/मंडळे, बँका इत्यादींना लागू राहणार आहे असे नमूद आहे. तसेच ही सार्वजनिक सुट्टी उरण नगरपरिषद मतदार संघातील जे मतदार कामासाठी उरण नगरपरिषद मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांना देखील लागू राहील, असे नमूद आहे.

तरी उरण नगरपरिषद मतदार संघातील जे मतदार उरण नगरपरिषद मतदार संघाच्या हददीबाहेरील खाजगी संस्थामध्ये कामाला आहेत अशा खाजगी संस्थांना संबंधित मतदारांना उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ कामी मतदान हक्क बजावता यावा यासाठी दि.०२ डिसेंबर, २०२५ रोजी योग्य ती सवलत /सूट देणेबाबत आवाहन करण्यांत येत आहे.

**ठिकाण : उरण**
**दिनांक : २९/११/२०२५**

**सही/-**
**( डॉ. उध्दव कदम)**
निवडणूक निर्णय अधिकारी
उरण नगरपरिषद,सार्वत्रिक निवडणूक २०२५

# रोह्याच्या श्री खंडेराय देवस्थानचा चंपाषष्ठी पालखी सोहळा उत्साहात

**धाटाव :** रोहा येथिल श्री खंडेराय देवस्थान मंदिरात चंपाषष्ठी निमित्ताने श्री खंडेरायांचा पालखी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी रोहा शहरात श्री खंडेरायांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. भाविकांनी गर्दी करून पालखीचे दर्शन घेतले.

संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत व अनेक कुटुंबांचे कुलदैवत असलेल्या श्री खंडेरायांचे रोहा येथील धनगर आळी येथे सुंदर मंदीर आहे. या मंदिरात नेहमीच विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात. मंदिरातील चंपाषष्ठीचा उत्सवाला भाविकांची मोठी गर्दी होत असून हा उत्सव सहा दिवस चालतो. यावेळी मंदिरात भजन, किर्तन, तळीभंडार, महाआरती आदी धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे करण्यात आले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. गजानन महादेव ठाकूर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID : ३५३५६६१७७१४), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९७/१ खाते कमांक : ५६१ | १ | ०.०८.३० पो.ख. ०.०१.८० | ०.६२ |
| | | एकुण ०.१०.१० | |
| एकुण क्षेत्र ०.१०.१० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. वसंत शंकर पाटील व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID : १४६७१९६०३२५), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २२१/१/ब खाते कमांक : ५८२ | १ | ०.२९.०० पो.ख. ०.०२.०० | ४.४४ |
| | | एकुण ०.३१.०० | |
| एकुण क्षेत्र ०.३१.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. अविनाश लक्ष्मण ठाकूर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID : २००३०४१३१९८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २०५/२/ब खाते कमांक : ५९४ | १ | ०.१४.२० पो.ख. ०.००.५० | २.१२ |
| | | एकुण ०.१४.७० | |
| एकुण क्षेत्र ०.१४.७० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## Tender Notice

Rayat shikshan sanstha's

**Sau.Shakuntala Ramsheth Thakur Vidyalay, Ulwe, Navi Mumbai**

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the Proposed Construction of School Building.

The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site https://edumart.sets.co.in from **29/11/2025** Tender must be submitted online to this website up to **15/12/2025** upto 5.00 pm.

**Head Master**
**Sau. Shakuntala Ramsheth Thakur Vidyalay,Ulwe**
**MO:- 9820980893**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड येथे खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन हि जमिन मालक श्री. महादेव रामभाऊ बोरीटकर, जनार्धन रामभाऊ बोरीटकर, अशोक दत्ताराम बोरीटकर व अमोल दत्ताराम बोरीटकर सर्व रा. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड यांच्या मालकीची हिश्याची असुन खालील नमूद सर्वे नंबर मधील सर्व बिनशेती मिळकत यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवुन तशी बोलणी केलेली आहेतः-

**परिशिष्ट**

| अंनु क्र. | नगर भूमापन क्र. | एकूण क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|
| १. | ५९ | ३२८.९० |

तरी सदर जमीनीबाबत जमीन मालक महादेव रामभाऊ बोरीटकर,जनार्धन रामभाऊ बोरीटकर, अशोक दत्ताराम बोरीटकर व अमोल दत्ताराम बोरीटकर यांचे व्यतीरिक्त इतर कोणाचा काही हक्क, हितसंबध, कब्जा, लिज, भाडेकरार, बक्षीस, इजमेंट, गहान, दान, फरोक्त, भाडेपट्ट्टा, बोजा, वहिवाट वा इतर कुठल्याही प्रकारे हक्क असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत आपला दावा लेखी स्वरुपात, पुराव्यासहीत निम्न स्वाक्षरीकारांकडे खालील पत्यावर सादर करावा, तसे न केल्यास सदर व्यवहारास कोणाचीही कोणतीही हरकत नाही व असल्यास त्यांनी आपले सर्व हक्क वा दावे सोडुन दिले आहेत असे समजुन व गृहित धरुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व मागाहून कोणतीही हरकत वा तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २७/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. रोहित शां. जाधव**
**(खरेदीदारांचे वकील)**
**कार्यालयः- ४०३, ४ था मजला, दक्ष अपार्टमेंट, खारकर आळी, जांभळी नाका, ठाणे. (प)**
**पिन ४००६०१. मोबा न. ९३२२ ७६५४५१.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील **आनंत्या आल्या मोहीते** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे वाकडी, तालुका.पनवेल, जि.रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| आनंत्या आल्या मोहिते | ८९ | १ | ०-२४-८० पो.ख.०-००-५० ०-२५-३० | १.७८ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या** आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २७/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com

# मोरे महिला महाविद्यालयात एआय आणि सायबर सुरक्षेवर कार्यशाळा

**रोहे :** एम. बी. मोरे फाऊंडेशनचे सौ. वरदा सुनील तटकरे महिला महाविद्यालय, धाटाव, येथे गुरुवारी २७ नोव्हेंबर रोजी विद्यार्थिनींसाठी 'एआय आणि सायबर सुरक्षा' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. रोहा शहरातील 'बीट्स अँड बाइट्स' या कॉम्पुटर इन्स्टिटयूटचे संचालक अतुल करवा यांनी डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. वसंत शंकर पाटील व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID : २१९१८४८८७०४), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १५९/९ खाते कमांक : ५८२ | १ | ०.११.०० पो.ख. ०.००.५० | १.६९ |
| | | एकुण ०.११.५० | |
| एकुण क्षेत्र ०.११.५० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | Secretary/ Chairman, Satyam Co-Op. Housing Society Ltd., Plot No.23, Sector 1. Kalamboli, Tal. Panvel, Dist.Raigad | ०१ पिंपळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Satyam Co-Op. Housing Society Ltd.. Plot No.23. Sector 1. Kalamboli. Tal. Panvel. Dist. Raigad या सोसायटी आवारात मुख्य प्रवेशव्दारा समोर असलेल्या झाडांमुळे इमारतीत अग्निशमन वाहन व रुग्णवाहिका व इतर वाहने ये-जा करणेस अडथळा होत असल्याने बाधित होत आहे. |
| २ | उप अभियंता, उद्यान विभाग, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०२ आंबा व ०३ शुबाबुळ अशी एकूण ०५ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ', प्लॉट नं-२५ व २५बी, सेक्टर-१५. खारघर, नवी मुंबई या भूखंडाच्या आवारातील ०५ झाडे गार्डन विकसित करणेकामी नियोजित बांधकामात बाधित होत आहेत. |
| ३ | उप अभियंता, बांधकाम (श.अ), पनवेल महानगरपालिका, पनवेल | २४ बोर व ०१ करंज अशी एकूण २५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ', प्लॉट नं ९ए, सेक्टर-३५एफ, खारघर, ता. पनवेल जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील २५ झाडे ट्रॅफिक पार्क विकसित करणेकामी नियोजित बांधकामात बाधित होत आहेत |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र.:- PMC-PARK/696/2025-PTAD
दिनांक :- २८/११/२०२५

**सही/-**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# पनवेल महापालिकेतर्फे बांधकामस्थळांची पाहणी

## ■ निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई उच्च न्यायालयाच्या हवा प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धनाबाबतच्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी पनवेल महानगरपालिका प्रशासन सक्रिय झाले असून, त्यानुसार निरीक्षण, तपासणी आणि कारवाईची मोहीम राबविण्याच्या सूचना आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्या आहेत.

या मोहिमेचा एक भाग म्हणून २७ नोव्हेंबर २०२५ रोजी कामोठे आणि खारघर प्रभाग समिती क्षेत्रातील विविध बांधकाम स्थळांची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान उप आयुक्त मा. स्वरूप खारगे यांनी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या १५ मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे बांधकाम स्थळांवरील उपाययोजनांची प्रत्यक्ष तपासणी केली.



तपासणीदरम्यान साइटवरील धूळ नियंत्रण, बांधकाम साहित्याचे संरक्षित साठवण, जिओ-फेंसिंग किंवा कव्हरिंग, रस्त्यांवर धूळ नियंत्रणाची साधने, पाणी मारण्याची यंत्रणा, डेब्रिज व कचरा व्यवस्थापन आणि कामगारांची सुरक्षा साधने (विशेषतः मास्क वापर) यांसारख्या बाबींचे निरीक्षण करण्यात आले.

पाहणीत काही बांधकाम प्रकल्पांनी मार्गदर्शक नियमांचे योग्य पालन केल्याचे आढळले; मात्र काही ठिकाणी मार्गदर्शक नियमांचे अंशतः पालन किंवा गंभीर त्रुटी जसे की धूळ नियंत्रण उपाययोजनांचा अभाव आणि बांधकाम साहित्य उघड्यावर ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. संबंधित बांधकाम प्रकल्पांना तत्काळ नोटिसा देण्याचे, दंडात्मक कारवाई करण्याचे आणि आवश्यक सुधारणात्मक उपाययोजना राबविण्याचे आदेश प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या पाहणीदरम्यान पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, कामोठे प्रभाग अधीक्षक दिपक शिलकन, खारघर प्रभाग अधीक्षक जितेंद्र मढवी, लिपिक प्रवीण व्हळगल तसेच कर्मचारी स्वप्नील कांबळे उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेने नागरिक आणि प्रकल्प विकासकांना पर्यावरण संरक्षणाबाबत जबाबदारीने वर्तणुक करण्याचे आवाहन केले आहे.

# सानपाडा, जुईनगर रेल्वेस्थानक परिसरात सिडकोची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मु) विभागामार्फत २७ सानपाडा नोड येथे. निष्कासन मोहिम राबवुन सिडकोच्या अधिसूचित, संपादित जागेवरील व रेल्वे स्टेशन परिसरातील अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आले.



सानपाडा नोड, सेक्टर-२४, भूखंड क्र. ६१ व ६२, अंदाजे क्षेत्रफळ ४०० चौ.मी. क्षेत्रामधील २ तात्पुरत्या बांबू व पत्रा शेडचे अनधकृत बांधकाम बांधकामे, अतिक्रमणे निष्कासित करण्यात आले. जुईनगर रेल्वे स्टेशन परिसरातील फुड स्टॉल धारकांच्या व दिव्यांग स्टॉलधारकांच्या वाटपीत जागे व्यतिरिक्त वाढीव जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले.

तसेच सानपाडा रेल्वे स्टेशन व ६ कीओस्क स्टॉल भोवती असलेली स्टील काउंटर, भंगार काऊंटर जप्तकरण्यात आले. तसेच पक्के किचन, ३ बेसीन, २ पक्की भिंत, १० बांबु व ताडपत्री शेड, निष्कासित करण्यात आले. सदरची कारवाई सहा.कार्यकारी अभियंता यांच्या समवेत पूर्ण करण्यात आली.

सिडको महामंडळाकडून अथवा संबधित प्राथिकरणाकडुन कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न उभारण्यात आले असल्यामुळे निष्कासित करण्यात आले. व सर्व जप्त केलेला माल, सामान २ ट्रक भरून सिडको गोडाऊन जमा करण्यात आले.

सदरची मोहीम मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको अतिक्रमण विमागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत मोहीम राबविण्यात आली.

# सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कोपरा विद्यालयास आदर्श शाळा पुरस्कार प्रदान



**पनवेल, उरण : वार्ताहर**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू ह्याच्या नेतृत्वा खाली नऊ वर्ष समाजसेवेचे उपक्रम राबवत आहे. आज आदर्श शाळा तालुका हा उपक्रम हाती घेऊन रायगड जिल्हातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळा निवडत आहे त्या प्रमाणे पनवेल तालुकामधून सुधागड एज्युकेशन सोसायटी ह्या शाळेला पनवेल तालुका आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला.

सदर पुरस्कार पत्रकार मिलिंद खारपाटील (सल्लागार) यांच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका गावित यांनी स्वीकारला. यावेळी बोलताना गावित म्हणाल्या की, आता पनवेल तालुक्यातून आमच्या शाळेला आदर्श शाळा म्हणून पुरस्कार मिळाला त्या बद्दल मी चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड चे आभारी आहोत आणी या पुढे आमची जबाबदारी वाढेल व शाळेतील मुलांसाठी आणखी काही जास्तीत जास्त विकास कसा होईल ह्या गोष्टीवर भर देण्यात येईल तसेच

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संतोष तांबोळी (मा.सरपंच), संतोष गायकर (मा. उपसरपंच), वैभव गायकर (पत्रकार), जेष्ठ नागरिक सीताराम म्हात्रे (मीडिया सल्लगार) यांची उपस्थिती होती. तर शाळेतर्फे नूतन जगताप, बाळासाहेब सोलासे, प्रकाश पाटील, लक्ष्मण इंगोले, सुप्रिया लांडगे, जयसिंग थोरात, संतोष पाटील, सुनील निकुंभ, वैशाली पाटील, संगीता मगरे, जाकीरहुसेन मान्सूरी व कर्मचारी उपस्थितीत होते. संस्थेतर्फे संस्थे चे संस्थापक अध्यक्ष विकास कडू, विनायक म्हात्रे (पनवेल तालुका अध्यक्ष), साजन वास्कर (पनवेल तालुका उपाध्यक्ष), मयुरेश करमेलकर (प्रसिद्धी प्रमुख रायगड), अभिषेक माळी सदस्य, विवेक कडू सदस्य हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास कडू यांनी केले ते बोलताना म्हणाले सुधागड एज्युकेशन सोसायटीचे कोपरा विद्यालय ही एक शाळा नसून एक कुटूंब आहे, कारण शाळेत मुलांच्या शिक्षणाची खूप चांगल्या प्रमाणात काळजी घेतली जाते विशेषता सुरक्षाच्या बाबतीत मुलाच्या शारीरिक विकास अर्थात खेळा कडे,मुलांना सुसज्य सायन्स लॅब, नीट नेटके ग्रंथलंय या सारख्या अनेक सोयी आहेत आजवर या शाळेला कुठलाही गालबोट लागलेला नाही, म्हणून पनवेल तालुक्यातील ही आदर्श शाळा आहे

# गव्हाण फाटा येथे रस्ते सुरक्षा जनजागृती

**उरण : प्रतिनिधी**

गव्हाण फाटा वाहतूक विभागाने रस्ते सुरक्षा आणि वाहतुकीच्या शिस्तीसाठी महत्वाच्या ठिकाणी विशेष जनजागृती मोहीम राबविली. सिग्नल असलेल्या चौकांवर रिक्षाचालक तसेच अन्य विविध प्रकारच्या वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी आवाहन केले. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद लाभला. त्याच प्रमाणे विशेष मोहिमे अंतर्गत पोलिस ठाण्यातील पोलिसांशी समन्वय साधून नाकाबंदी करण्यात आली. यामध्ये मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कडक कारवाई करण्यात आली.



या मोहिमेत वाहतुकीची शिस्त पाळण्याची प्रतिज्ञा नागरिकांनी काही महत्वाच्या जबाबदाऱ्या स्विकारल्या. दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर, चार चाकी वाहन चालवितांना सिटबेल्ट लावणे, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर न करणे, वाहतूक सिग्नलचे पालन करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे आदी नियमांना वाहनचालकांनी सकृतदर्शनी मान्यता दिली. यामध्ये गव्हाणफाटा नाक्यावरील रिक्षाचालकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. सुरक्षित व नियमबद्ध वाहनचालकांना वाहतुक कोंडी टाळण्यासाठी सहकार्य, परवाशांशी सौजन्यपूर्ण संवाद आणि महामार्गावर परस्पर सहकार्याची भावना राखण्यावर महत्वपूर्ण भर देण्यात आला.

गव्हाणफाटा वाहतूक शाखेने मागील तीन महिन्यांपासून अपघातांची संख्या कमी करण्यासाठी या विभागातील शाळा,कॉलेज आणि सामाजिक संघटना यांच्या सोबत जनजागृती उपक्रम राबविले आहेत. त्यामुळे हा वाहतूक पोलिसांचा विभाग केवल वाहनचाकांवर दंडात्मक कारवाई करणारा न राहता, नागरिकांचे हित जपणारी आणि सामाजिक जबाबदारी पाड पडणारी संस्था म्हणून पुढे येत आहे.

या उपक्रमांमुळे रस्त्यावरील वाहनांची शिस्त सुधारून अपघातांची संख्या कमी होण्यास मदत होईल.असा विश्वास गव्हाणफाटा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन बडगुजर यांनी व्यक्त केला आहे.

# मृणाल खेडकर यांनी कामठा निवडणूक बूथला दिली सदिच्छा भेट

**उरण : वार्ताहर**

उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक संदर्भात विचार विनिमय ,मार्गदर्शन करण्यासाठी कोकण निवडणूक सह प्रभारी महिला मोर्चा मृणाल खेडकर यांनी गुरुवार ( दि.२८) रोजी उरण नगरपरिषद हद्दीतील कामठा (उरण) येथील प्रभाग क्रमांक १० येथील निवडणूक बूथला भेट देवून उमेदवारांना मार्गदर्शन केले.

या वेळी भाजप ग्रामीण महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, प्रभाग क्रमांक १०चे उमेदवार राजेश ठाकूर, प्रभाग क्रमांक १०च्या उमेदवार सायली म्हात्रे, प्रभाग क्रमांक १०च्या उमेदवार दमयंती म्हात्रे, प्रभाग क्रमांक ३च्या उमेदवार नम्रता ठाकूर, प्रभाग क्रमांक २च्या उमेदवार रिबेका मढवी, उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, सरचिटणीस शमिता ठाकूर, निर्मला घरत, चेतना तांडेल उपस्थित होते.





**उरण : तालुक्यातील धुतूम गावचे युवा सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धुतूमचे गाव अध्यक्ष समाधान कृष्णा कटेकर यांचा वाढदिवस गावात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कटेकर यांना शुभेच्छा दिल्या.**

# तुषार सिनलकर यांचा पोलीस आयुक्तांकडून गौरव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कुचिंग, मलेशिया येथे पार पडलेल्या १०व्या आशियाई पॅरा तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये भारतीय संघाचे प्रशिक्षक तुषार तानाजी सिनलकर यांना 'सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

तुषारने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा गौरव वाढविला असून, त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, सीबीडी बेलापूर येथे प्रशंसापत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



या वेळी नवी मुंबई पोलीस दलाचे सहआयुक्त संजय येनपुरे, अति. आयुक्त (गुन्हे) दीपक साकोरे, अन्य सहाय्यक आयुक्त, पोलीस निरीक्षक, इतर अधिकारी तसेच अंमलदार उपस्थित होते.

दरम्यान, तुषार सिनलकर हे तायक्वांदो प्रशिक्षण क्षेत्रात एक दशकाहून अधिक काळ कार्यरत असून 'आंतरराष्ट्रीय पंच' देखील आहेत. त्यांनी आजवर ३ वेळा भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पडली असून २ आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय पंच म्हणून काम पाहिले आहे. याशिवाय अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा तसेच भारतीय संघ निवड चाचणीमध्ये त्यांनी पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

तुषार यांच्या यशाबद्दल त्यांचे नवी मुंबई पोलीस, रायगड व ठाणे जिल्हा तायक्वांदो संघटना तसेच महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशन, गुरूकुल तायक्वांदो अकॅडमी, खेळाडू, पालक, प्रशिक्षक अशा विविध स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# कै. मधुकर ठाकूर प्रतिष्ठानतर्फे आवरे येथे रक्तदान शिबिर

**उरण : बातमीदार**

निष्ठावंत शिवसैनिक स्व. दिलीप मधुकर ठाकूर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने समर्पण ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने शनिवार दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत भोलानाथ मंदिर आवरे येथे कै मधुकर ठाकूर प्रतिष्ठान आवरे, मर्दनगड संवर्धन समिती, शिवसेना युवा सेना आवरे यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या भव्य रक्तदान शिबिरात मोठया संख्येने सहभागी होऊन रक्तदात्यांनी मोठया प्रमाणात रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी रक्तदात्यांनी आयोजकांशी संपर्क साधावे असे आवाहन करण्यात आले आहे. कौशिक ठाकूर -९८२११११९६१७, सुनिल वर्तक - ९८२०१३००८८, गणेश ठाकूर - ९५९४९५१८१६ , महेश गावंड - ९८७०५६१३७९.

# युईएस कॉलेजमध्ये क्षमता विकास प्रशिक्षणवर्गाचा समारोप

**उरण : वार्ताहर**

यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी मध्ये७ दिवसीय क्षमता विकास प्रशिक्षण वर्गाचे दिनांक १० नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दोन बॅचमध्ये आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमाचा समारोप समारंभ सोमवार दिनांक २४-११-२०२५ रोजी संपन्न झाला.



ह्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोत्कृष्ट डॉक्टर पुरस्कार सन्मानित डॉ. सत्या ठाकरे ह्यांना आमंत्रित केले होते त्यांच्यासोबत राष्ट्रपती पदक विजेते, निवृत्त नागरी संरक्षण दल अधिकारी आणि नोडल अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय रायगडचे श्री. मनोहर केशव म्हात्रे, निवृत्त सहाय्यक उपनियंत्रक एच. एम. भोईर, सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाठ, केंद्र सरकारचे कांस्यपदक विजेते व विभागीय वॉर्डन उरण तालुक्याचे श्री. हरेश्वर ठाकूर, नागराज शेठ सीबीएसई आंतरराष्ट्रीय शाळेच्या प्राचार्या आणि सिव्हिल डिफेन्सच्या मास्टर ट्रेनर श्रीमती ज्योती म्हात्रे तसेच सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता व विभाग प्रमुख, शिक्षकवर्ग, शिक्षेकतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थितहोते.

कार्यक्रमाची सुरुवात वरील सर्व मान्यवरांच्या स्वागताने झाली त्यानंतर सिव्हिल डिफेन्सच्या काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले, विजेत्या विदयार्थ्यांना गौरविण्यात आले.

# संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**नवी मुंबई : बातमीदार**

संविधान दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात म्फिथिएटर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या वेळी अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.



२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्विकृत करुन २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानाचे महत्त्व अनेक स्तरांवर असून भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत संविधान महत्वपूर्ण भूमिका बजावते. त्या अनुषंगाने आज संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले

# पालिका निवडणूक : बंदी आदेश जारी

## नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ अन्वये विविध निर्बंध

रायगड : रामप्रहर वृत्त

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर रोजीच्या आदेशान्वये राज्यातील नगर परिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील नगर परिषद, नगरपंचायत हद्दीमध्ये मंगळवार, २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

या निवडणुकीच्या अनुषंगाने निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहणार असून निवडणूक खुल्या व निर्भय वातावरणात पार पाडणे तसेच मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क निर्भयपणे बजावता येणे आवश्यक आहे. याकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ नुसार जिल्ह्यातील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) नगर परिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाच्या अनुषंगाने २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या मतदान समाप्तीकरिता निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास अगोदरच्या कालावधीमध्ये विशिष्ट कृती करण्यास मनाई जारी केला आहे.

पाचपेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई आहे. निवडणूक प्रचार करणे, सार्वजनिक सभा, बैठका घेणे इत्यादी कृतीस मनाई आहे. (तथापी घरोघरी भेटी, प्रचारास मनाई नाही), राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने बल्क मेसेज करण्यास मनाई आहे. ज्या नगर परिषद, नगरपंचायत हद्दीमध्ये मतदान होणार आहे, तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते, नेते यांना त्या नगर परिषद, नगरपंचायत हद्दीमध्ये थांबण्यास मनाई आहे.

लाउडस्पीकर वापरास मनाई आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस मोबाईल फोन, वायरलेस किंवा इतर संपर्क साधने घेवून जाण्यास मनाई आहे. (निवडणुकीशी संबंधित कामाकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी व सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी वगळून). मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात लाउडस्पीकर, मेगाफोन वापरणे, आरडा-ओरड करणे, गोंधळ घालणे, गैरवर्तन करणे इत्यादी कृती करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस शस्त्र घेऊन जाण्यास मनाई आहे. (अपवाद -मतदान केंद्राच्या सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी, ज्या व्यक्तीस SPG/Z+ दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे. अशा व्यक्तीस साध्या वेशात एक सुरक्षा रक्षक शस्त्र लपवलेल्या स्थितीत घेऊन जाता येईल). मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे.

मतदारांना देण्यात येणारी चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी. त्यावर कोणत्याही उमेदवाराचे नाव, पक्षाचे चिन्ह, पक्षाचे नाव नसावे. मतदान केंद्राच्या परिसरात पक्षाचे कार्यकर्त्यांचे निवासस्थाने असल्यास त्याठिकाणी प्रचार करणे, बैठका घेणे, मतदानाकरिता जाणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस वाहन आणण्यास मनाई आहे. (अपवाद अपंग, वृध्द, आजारी मतदारांना घेवुन येणारी वाहने). मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसराचे आत राजकीय पक्षांचे, उमेदवारांचे निवडणूक बूथ लावण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या २०० मीटर बाहेर निवडणूक बूथ लावताना खालील अटींचे पालन करावे. बूथ लावण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी व बूथ लावणेवावत निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगाऊ माहिती द्यावी. प्रत्येक बूथवर कमाल एक टेबल, दोन खुर्चा असाव्यात. बुथकरिता लावलेल्या मंडपाचा आकार १० बाय १० फुटपेक्षा जास्त नसावा. प्रचार कालावधी संपल्यानंतर राजकीय पक्ष प्रचाराला भरीव चालना देण्यासाठी, मतदार संघाच्या बाहेरुन पाठीराख्यांना आणण्यासह त्यांच्या समर्थकांची हलवाहलव करतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेता प्रचार कालावधी संपल्यानंतर मतदारसंघात कोणताही प्रचार होऊ नये यासाठी बाहेरुन आणलेले आहेत व जे त्याच्या, तिच्या मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय कार्यकर्ते, पक्ष कार्यकर्ते, मिरवणुकीतील कार्यकर्ते, प्रचार कार्यकर्ते, इत्यादींना नियमितपणे मतदारसंघामध्ये उपस्थित राहता येणार नाही, कारण प्रचार संपल्यानंतर, त्यांच्या निरंतर उपस्थितीमुळे मुक्त व निष्पक्ष मतदानाचे वातावरण धोक्यात येऊ शकते.

हा मनाई आदेश रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) नगर परिषद, नगरपंचायत मतदार संघाच्या हद्दीत ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते २ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत अंमलात राहील. या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम २२३नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोहा पोलिसांचे पथसंचलन

रोहा : प्रतिनिधी

रोहा अष्टमी नगर परिषदेची निवडणूक सुरू असून या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरातून पथसंचलन करण्यात आले.

नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्याकरिता तसेच निवडणूक निर्भय, भयमुक्त वातावरणात शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने रोहा पोलीस ठाणे हद्दीत गुरुवारी सकाळी १०.३० ते ११.१५ वाजताच्या दरम्यान पोलिसांनी पथसंचालन केले.

महात्मा फुले नगर, रोहा खालचा मोहल्ला, वरचा मोहल्ला, मोरे आळी, मारुती चौक, धनगर आळी, अंधार आळी, नेहरू नगर सागर डेरी, दमखाडी, रायकर पार्क, रोहा कोलाड रोड, तीनबत्ती नाका, बाजारपेठ, फिरोज टॉकीज ते रोहा पोलीस स्टेशन असे पथसंचलन करण्यात आले.

या पथसंचालनात उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे, निरीक्षक मारुती पाटील यांच्यासह रोहा पोलीस ठाणे कडील दोन अधिकारी, १० अंमलदार, माणगाव आरसीपी प्लाटूनचा एक अधिकारी, २२ अंमलदार, रोहा उपविभागातील कोलाड, नागोठणे, पाली येथील १५ अंमलदार सहभागी झाले होते.



## सोने आणि रोख रक्कम असलेली बॅग शोधून केली कुटुंबाला परत

### महामार्ग पोलिसांची तत्परता

खोपोली : प्रतिनिधी

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवेवरून दुपारी प्रवास करत असताना पडवळ कुटुंबाची हरवलेली बॅग महामार्ग पोलिसांनी शोधून पडवळ कुटुंबाला परत केली.

एक्सप्रेस वेवरून पृथ्वीराज पंडितराव पडवळ आणि आरती पंडितराव पडवळ कुटुंब हे पुण्याहून मुंबईकडे प्रवास करत असताना बोरघाटातील फूडमॉल ते खालापूर टोलनाक्यादरम्यान त्यांची सोन्याची बॅग हरवल्याची तक्रार खालापूर टोलनाका येथील महामार्ग पोलिसांना देण्यात आली होती.



एक्सप्रेस वेवर कार्यरत हवालदार मोरे आणि सलगर यांनी या घटनेची दखल घेत शोध घेतला असता त्यांना फूडमॉल परिसरात बॅग मिळून आली. या बॅगेत अडीच तोळे सोन्याचे गंठण आणि पाचशे रुपये रोख रक्कम होती. त्यांनी ती बॅग पडवळ यांना परत केली.

## श्री सोमजाई बहिरी देवस्थान प्राणप्रतिष्ठा आणि मंदिर लोकार्पण

माणगाव : बातमीदार

अंबर्ले-लोणेरे परिसरातील श्री सोमजाई बहिरी देवस्थानाच्या प्राणप्रतिष्ठा व नवीन मंदिर उद्घाटनाचा भव्य सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात झाला. या सोहळ्याचे उद्घाटन मंत्री भरत गोगावले आणि माजी जिल्हा परिषद सदस्य सुषमा गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

मंदिर परिसरात पहाटेपासूनच भक्तांचा मोठा जनसमुदाय दर्शनासाठी उपस्थित राहिला होता. कार्यक्रम सलग चार दिवस मोठ्या उत्साहात ढोल-ताशांच्या गजरात, शंख-घंटांच्या निनादात, श्री सोमजाई माता की जय अशा जल्लोषपूर्ण जयघोषात प्राणप्रतिष्ठा



विधी झाले. धार्मिक विधी, होम-हवन, अभिषेक, महाआरती यांनी समारंभाला विशेष दिव्यता प्राप्त झाली.

या वेळी उपस्थित संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, महिला जिल्हाप्रमुख नीलिमा घोसाळकर, महाड विधानसभा समन्वयक निलेश केसरकर, उपतालुकाप्रमुख पंढरी शेडगे, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, रामभाऊ टेंबे, उद्योजक सीताराम उभारे, माजी सरपंच रघुनाथ उभारे, जगदीश भोकरे, सचिन शिगवण,वामन बैकर, दिनेश हरवंडकर, युवासेना उपतालुकाप्रमुख अभिजित टेंबे, विभाग प्रमुख रवींद्र टेंबे, रोहित रातवडकर, समाधान करकरे, माजी सरपंच अनिता महाबळे, अंबर्ले सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक, युवासैनिक अंबर्ले ग्रामस्थ, विठ्ठल रखुमाई अंबर्ले ग्रामस्थ, उभारेवाडी ग्रामस्थ, वडाचा कोंड अंबर्ले ग्रामस्थ तसेच मुंबई मंडळ अजून बाजूच्या गावातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेण प्रभाग क्र. ६मध्ये मतदानासाठी दोन बॅलेट युनिट बसविण्याचा निर्णय

पेण : प्रतिनिधी

नगर परिषद निवडणूक यंदा अधिकच रंगतदार ठरण्याची चिन्हे दिसून येत आहेत. विशेषत्वाने प्रभाग क्रमांक ६ अ व ब मध्ये मिळून १६ उमेदवार रिंगणात असल्याने या प्रभागाकडे संपूर्ण शहराचे लक्ष वेधले गेले आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेदरम्यान दोन बॅलेट युनिट्स बसविण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक प्रशासनामार्फत देण्यात आली आहे.

एका प्रभागात दोन बॅलेट युनिट्स बसवण्याचा निर्णय पहिल्यांदाचे घेतला जात असून त्यामुळे निवडणूक यंत्रणेवर अतिरिक्त ताण पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यंदाच्या निवडणुकीत शहरातील पेण नगरपालिका बहुतांश प्रभागांमध्ये भाजप-राष्ट्रवादी महायुती, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, 'आम्ही पेणकर' आघाडी, नगर विकास आघाडी तसेच अपक्ष उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे ही निवडणूक प्रस्थापित सत्ताधाऱ्यांविरोधात होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

पेण नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याची नोंद झाली आहे. सध्या नगराध्यक्षपदासाठी तीन उमेदवार आणि नगरसेवकपदासाठी एकूण ४५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग ६ मध्ये १६ उमेदवार असल्यामुळेच या प्रभागात दोन बॅलेट युनिट्स बसवण्याचा निर्णय घेतल्याची अधिकृत माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी दिली.

## २ डिसेंबर रोजी आठवडा बाजार पूर्णवेळ राहणार बंद

रायगड : रामप्रहर वृत्त

जिल्ह्यातील (पोलीस अधीक्षक रायगड कार्यक्षेत्रातील) नगर परिषद, नगरपंचायत मतदारसंघात मंगळवार, २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा तसेच मतदान सुरळीतपणे पार पडणे आवश्यक असल्याने मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील (पोलीस अधीक्षक रायगड कार्यक्षेत्रातील) नगर परिषद, नगरपंचायत मतदार संघात ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरणार आहे, अशा सर्व ठिकाणी बाजार व जत्रा अधिनियम १८६२चे कलम ५ (ग)मधील तरतुदीनुसार आठवडा बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याबाबतचा बंदी आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर रोजीच्या आदेशान्वये राज्यातील नगर परिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील नगर परिषद, नगरपंचायत कार्यक्षेत्रात २ डिसेंबर रोजी मतदान आहे.

## मुरूड नगर परिषद हद्दीमध्ये मतदार जागृतीपर पथनाट्य सादर

मुरुड : प्रतिनिधी

आगामी मुरुड नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने निवडणूक निर्णय अधिकारी आदेश डफळ यांच्या आदेशाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्सच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नगर परिषद मुरुड-जंजिरा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, मतदार जागरुकता पथनाट्य सादर करण्यात आले.



हे पथनाट्य मुरुड-जंजिरा उर्दू स्कूल पेट मोहल्ला, मुरुड मार्केट, आणि नगर परिषद कार्यालय अशा तीन प्रमुख ठिकाणी सादर केले.

पथनाट्यात मतदानाचे महत्त्व, प्रत्येक मताचे मूल्य, सुजाण नागरिकाची भूमिका आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्रीय सहभागाची गरज यांचे आकर्षक व प्रभावी सादरीकरण करण्यात आले. स्वयंसेवकांनी नागरिकांना आपला मताधिकार नक्की वापरा जबाबदार नागरिक होण्यासाठी मतदान आवश्यक आहे असा संदेश दिला. या पथनाट्याला स्थानिक नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या पथनाट्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना समिती सदस्य प्रा. अल्ताफ फकीर, तसेच मुरुड नगर परिषदेतर्फे सतेज निमकर व आशितोष पाटील यांनी विशेष मेहनत घेतली. या पथनाट्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थी अनस सिद्दीकी, अझैन हद्दादी, सफा हमदुले, मनाल करबरी आणि उमैमा दळवी यांनी सक्रीय सहभाग घेत उत्कृष्ट अभिनयाद्वारे मतदार जनजागृतीचे काम केले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांनी नदीवर बांधला दगडी बंधारा

मुरुड : प्रतिनिधी



भारतीय संविधान दिनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्या दिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांना सामाजिक कामाची जाण व्हावी, त्यांना मेहनत करण्याची सवय लागावी यासाठी पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयातील सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या श्रमातून शेनाटे आदिवासीवाडी येथे नदीच्या वाहत्या पाण्यावर दगडी बंधारा बांधून पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेचा उपयोग करून एक उत्कृष्ट दगडी बंधारा बांधण्यात आला आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा दगडी बंधारा बांधण्यात येऊन श्रमदानाचे एक उत्तम व सफल कार्य यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. या नदीवर बंधारा बांधून लोकांना जाण्या येण्याचा मार्गसुद्धा बनवला आहे.

समाजसेवा उपक्रमांतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या घरातील कोयते, पारय, घमेले, फावडे हे साहित्य आणावयास सांगून शालेय परिसर स्वच्छ केला आहे, वाढलेली झाडे झुडपे नष्ट करणे, मातीचा भराव टाकणे, रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडे झुडपे कोयतिच्या साहाय्याने कट करून तिचे योग्य विल्हेवाट लावण्यात आली. सदरील स्वच्छता मोहिमेत या शाळेचे चेअरमन खेळू वाजे व सचिव संजय रेडीज स्वतः सहभागी होऊन मुलांचा उत्साह वाढवला आहे. या वेळी रस्त्यावर पडलेले खड्डेसुद्धा माती टाकून बुजवण्यात आले. समाजसेवा उपक्रमात असंख्य शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. समाजसेवा उपक्रम झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते गणेश बामणे आणि नगरपंचायतीच्या नगरसेविका ग्रीष्मा बामणे यांच्यातर्फे विद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांना पावभाजी हा अल्पोहार देण्यात आला.

याबद्दल संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष खेळूशेठ वाजे, सचिव संजय रेडीज व विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे यांच्यातर्फे आभार मानण्यात आले. या वेळी संविधान वाचनसुद्धा करण्यात आले. या उपक्रमावेळी ज्येष्ठ शिक्षक अकिल मुलाणी, संजय ठमके, सुखदेव सवई सर्जे, भागिनाथ बांगर, संदीप इंगवले, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी, रेखा रेडीज, नीलम गोळे, मुख्य लिपिक दीपक भोसले आदी उपस्थित होते.

## मोरे महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन सत्र

रोहे : प्रतिनिधी

एम.बी. मोरे फाऊंडेशनचे सौ वरदा सुनील तटकरे महिला महाविद्यालय धाटाव रोहा येथे विद्यार्थिनींसाठी आयोजित सत्रात 'चाइल्ड हेल्प फाउंडेशन', मिरा रोड, मुंबई येथील सदस्य आकाश मिंदे यांनी मुलींची सुरक्षा, समान संधी, कायदेशीर हक्क, बाल विवाह प्रतिबंध, स्त्री-भ्रूणहत्या यांसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

आजच्या सत्राला महिला महाविद्यालयातील ८२ विद्यार्थिनींनी उपस्थित राहून उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण कक्षाच्या प्रमुख प्रा दिपाली वारंगे आणि प्रा विजीता पडवळ यांनी सत्राचे नियोजन, समन्वय यशस्वीरीत्या केले.




## डॉ. अविनाश पाटील, मनोहर कोळंबे पुरस्काराने सन्मानित



कर्जत : प्रतिनिधी

कर्जत येथे आयोजित आगरी शाळा या एकदिवसीय कार्यशाळेत आगरी समाजातील कला आणि साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या दोन मान्यवरांना आगरी कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आगरी ग्रंथालय चळवळ आणि कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्या माध्यमातून आगरी भाषेतील ग्रंथालय नेरळ येथील आगरी समाज हॉलमध्ये सुरु करण्यात आले तसेच या एकदिवसीय कार्यशाळेत आगरी शाळा या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

या आगरी शाळेचे फित कापून उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा अनिल जोशी यांचे हस्ते झाले. तर आगरी ग्रंथालय यांचे उद्घाटनदेखील झाले. या प्रसंगी ह.भ.प. जयेशमहाराज भाग्यवंत, रायगडभूषण कवी प्रा. एल. बी. पाटील, इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे, लेखक मोरेश्वर पाटील, संगीतकार दया नाईक, आगरी ग्रंथालय चळवळ प्रमुख साहित्यिक सर्वेश तरे, कवी प्रशांत मोरे आणि शिवनाथ बाबा आदी उपस्थित होते.

आगरी भाषेत पीएचडी करणारे पनवेल येथील डॉ. अविनाश पाटील आणि स्थानिक कलाकार, ज्युनियर जॉनी लिव्हर म्हणून ओळखलेले जाणारे मनोहर तुकाराम कोळंबे यांना आगरी कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# रायगडसह अन्य संघांची आगेकूच

**पुणे : प्रतिनिधी**

४१व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी व आमदार चषक कबड्डी स्पर्धेत पुणे ग्रामीण, जळगाव, कोल्हापूर, सांगली, रायगड यांनी कुमार विभागात; तर कुमारी विभागात पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर, नांदेड, पुणे ग्रामीण, धाराशिव व नाशिक शहर संघांनी विजय मिळवत आगेकूच केली.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे व राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथे ही स्पर्धा होत आहे. तिसऱ्या दिवशी सायंकाळच्या सत्रात दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत झालेल्या साखळी सामन्यात मुलांमध्ये पुणे ग्रामीण संघाने हिंगोली संघावर ६७-२४ असा दणदणीत विजय मिळवित आपल्या गटात घोडदौड चालू ठेवली. पुणे ग्रामीणच्या संजय केकण, उमेश नाळे यांच्या चढाया व सार्थक पाटील, माऊली शितोळे यांच्या पकडींच्या जोरावर पुणे ग्रामीण संघाने सहज विजय मिळविला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे ३१-११ अशी आघाडी घेत सामन्यावर पकड मिळविली होती. सामन्याच्या पूर्वार्धात





पुणे ग्रामीण संघाने दोन लोन व उत्तरार्धात तीन लोन लावत आपल्या संघाचा विजय सोपा केला. हिंगोलीच्या आर्यन नवघरे, शिवम सोळंके यांच्या चढाया व आदित्य तायडे आणि हरिष जगतापच्या पकडीमुळे सामन्यात काहीसी रंगत आली होती.

जळगावच्या हर्षल बागुल, जुनेद खाटीक यांच्या चढायांच्या जोरावर व तेजेंद्र सपकाळे, प्रतिक अवसमोल यांच्या पकडीच्या जोरावर ४५-४४ अशा अवघ्या एक गुण फरकाने मुंबई शहर पश्चिम संघाचा पराभव केला. मध्यंतराला दोन्ही संघ २०-२० अशा समान गुणांवर होता. मुंबई शहर पश्चिम संघाच्या अनेय दळवी, विनम्र लाड यांनी जोरदार प्रतिकार केला, तर सिद्धेश भोसले यांनी पकडी घेत सामना जिंकण्याचा अटोकाट प्रयत्न केला, मात्र त्यांना त्यात यश आले नाही.

रायगड संघाने सिंधुदुर्ग संघावर ६३-१९ असा एकतर्फी विजय मिळविला. मध्यंतराला रायगड संघाकडे २८-४ अशी निर्णायक आघाडी होती. रायगडच्या निरज मिसाळ, हर्ष सुरणकर यांच्या चढाया आणि कौस्तुभ साळुंखे, कुणाल खारीवाले यांच्या पकडीच्या जोरावर हा सहज विजय मिळविला. सिंधुदुर्गच्या निखिल चव्हाण व साहिल तावडे यांनी चांगला खेळ केला. कोल्हापूरच्या शुभम रेपे याच्या चढाया आणि हर्षल शिंदे, भूषण पाटील यांच्या पकडींच्या जोरावर सातारा संघाचा ४७-२३ असा पराभव केला. मध्यंतराला कोल्हापूर संघाकडे २८-८ अशी भक्कम आघाडी होती. सातारच्या अरिहंत भोसले व यश पाटील यांनी चांगला खेळ केला.

मुलींमध्ये पुणे ग्रामीण संघाच्या वैभवी जाधव, कोमल महाजन यांच्या चढाया व सानिया पटेल, सानिका वास्के यांनी पकडी घेत रायगड संघावर ३६-१८ असा विजय मिळविला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे १४-९ अशी आघाडी होती. रायगडच्या आदिती पानवलकर, अनन्या निर्मल यांच्या चढाया आणि अक्षरा गुरव, श्रावणी पाटील यांच्या पकडींमुळे सामन्यात रंगत आली. पिंपरी चिंचवड संघाने बीड संघावर ६६-११ अशी एकतर्फी विजय मिळवित स्पर्धेतील आपले आव्हान कायम ठेवले. पिंपरी चिंचवडच्या संतोषी थोरवे व साक्षी गायकवाड यांच्या जोरदार चढायांच्या जोरावर हा सहज विजय मिळविला. बीडच्या पायल राठोड हिने चमकदार खेळ केला.

अहिल्यानगर संघाने लातूर संघावर ५४-१८ असा सहज विजय मिळविला. मध्यंतराला नगरकडे २७-८ अशी आघाडी होती. नगरच्या वैष्णवी काळे, आरती कोळसे यांच्या जोरदार चढाया व कार्तिकी फडतरेने घेतलेल्या पकडींच्या जोरावर हा सामना सहज जिंकला. लातूरच्या अमृता निकम चमकली.

### इतर झालेले सामने

**मुले-ठाणे शहर वि.वि. लातूर** (४१-३३),
**सांगली वि. वि. सोलापूर** (४८-२३),
**कोल्हापूर वि.वि.सातार** (४७-२३)
**मुली-नांदेड वि. वि. परभणी** (२०-१६),
**नासिक शहर वि.वि. जळगाव** (६९-२४),
**उस्मानाबाद वि.वि.** सिंधुदुर्ग(३४-२२)

# 'खासदार श्री'चे पोझयुद्ध कोण जिंकणार?

## दिग्गजांमध्ये उद्या पीळदार स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शरीरसौष्ठवाची खरी संपत्ती रविवारी (दि. २३) क्रीडाप्रेमी खासदार आणि केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांच्या पुढाकाराने होत असलेल्या खासदार श्री शरीरसौष्ठव स्पर्धेच्या निमित्ताने मुंबईकर क्रीडाप्रेमींना याची देही, याची डोळा पाहायला मिळणार. त्यात कुणाचे बायसेप्स भारी असतील तर कुणाचे ट्रायसेप्स... काहींची छाती पाहून प्रेक्षकांचे उर भरून येईल तर कुणाची शोल्डर पाहून लय भारी वाटेल... वरच्या गटात तर काफ, थाइज, ॲब्ज आणि बॅक मसल्स म्हणजे



जणू काही बारीक नसानसांचे विणलेले जाळेच असल्याचा अनुभव येईल...

अत्यंत जोशपूर्ण वातावरण बोरीवली पश्चिमेला महावीर नगरातील वसंत कॉम्पलेक्सजवळील प्रमोद महाजन क्रीडा संकुलात होणाऱ्या खासदार श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत शरीरसौष्ठवाचा सळसळता उत्साह पहाण्यासाठी शरीरसौष्ठवप्रेमींचा जनसागर उसळणार हे निश्चित आहे.

यंदा मुंबईतील शरीरसौष्ठव स्पर्धेचा हंगाम पाच लाखांपेक्षा अधिक रकमेच्या खासदार श्रीने होतेय. या स्पर्धेच्या निमित्ताने हरमीत सिंग, निलेश दगडे, निलेश रेमजे, उमेश गुप्तासारखे मुंबईतीलतील एकापेक्षा एक असे १५०पेक्षा अधिक खेळाडूंमध्ये पीळदार पोझयुद्धाचा थरार क्रीडाप्रेमींना पाहायला मिळणार असल्याची माहिती खासदार श्री स्पर्धेचे संयोजक आणि निमंत्रक कुणाल केरकर यांनी दिली.

या लाखमोलाच्या स्पर्धेसाठी मुंबईचे दमदार शरीरसौष्ठवपटू तासन्‌तास वर्कआऊट करत आहेत. शरीरसौष्ठवपटूंना मालामाल करणार्या या स्पर्धेला खासदार गोयल यांचा मोलाचा हातभार लाभला आहे. स्पर्धेत मुंबईतील तयारीतील सर्व खेळाडू यावेत म्हणून बृहन्मुंबई शरीरसौष्ठव संघटना आणि मुंबई उपनगर शरीरसौष्ठव आणि फिटनेस संघटनेने चांगलीच मेहनत घेतली आहे. त्यामुळे रविवारी खासदार श्रीची भव्यता डोळे दिपवणारी असेल, असे संघटनेचे अध्यक्ष अजय खानविलकर यांनी म्हटले आहे.

### जेतेपदासाठी लाखमोलाचे संघर्ष

'खासदार श्री'ला एक लाख आणि एकूण पाच लाखांचे इनाम असल्यामुळे या किताबावर सर्वांच्याच नजरा लागल्या आहेत. प्रत्येक गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना १०, ८, ६, ५ आणि ४ हजार असे रोख पुरस्कार दिले जाणार असून ही स्पर्धा ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८० आणि ८० किलोवरील अशा एकंदर सात वजनी गटात खेळवली जाईल. एवढेच नव्हे तर स्पर्धेच्या उपविजेत्यालाही ५० हजार आणि तिसऱ्या क्रमांकाच्या विजेत्याला २५ हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्यामुळे जेतेपदासाठीच नव्हे तर गटविजेत्यासाठीही जोरदार संघर्ष पहायला मिळेल. त्याचबरोबर फिजीक फिटनेसचे दोन गट आणि महिलांच्या शरीरसौष्ठवाचाही एक गट या स्पर्धेत उतरणार असल्याची माहिती आयोजक कुणाल केरकर यांनी दिली.

# ऋतुराज की यशस्वी... वनडे मालिकेत रोहित शर्मासोबत कोण येणार सलामीला?

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाला नुकत्याच झालेल्या कसोटी मालिकेत ०-२ अशा पराभव पत्करावा लागला. कसोटी सामने संपल्यानंतर आता दोन्ही देशांदरम्यान वनडे आणि टी-२० मालिका खेळली जाणार आहे. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेची सुरुवात ३० नोव्हेंबरपासून होत असून टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून खेळली जाईल.

कर्णधार शुबमन गिल याला मानेच्या स्नायूमध्ये ताण आल्यामुळे तो दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी वनडे मालिकेत खेळणार नाहीये. त्यामुळे रोहित शर्मासोबत सलामी जोडीदाराच्या भूमिकेत ऋतुराज गायकवाड किंवा यशस्वी जैस्वाल यापैकी कोणाला संधी मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

भारतीय संघाकडे या भूमिकेसाठी यशस्वी जैस्वाल आणि ऋतुराज गायकवाड असे पर्याय



**द. आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी दोघांमध्ये चुरस**

उपलब्ध आहेत. यशस्वीने आतापर्यंत फक्त एकच वनडे सामना खेळला आहे. तो सामना फेब्रुवारी २०२५मध्ये इंग्लंडविरुद्ध नागपूर येथे झाला होता, ज्यात त्याने १५ धावा केल्या होत्या. यशस्वी काही मालिकांमध्ये बॅकअप ओपनर म्हणून संघात होता, पण त्याला अंतिम खेळाडूंमध्ये स्थान मिळाले नाही.

दुसरीकडे ऋतुराज गायकवाडने सहा वनडे सामने खेळले आहेत, त्यापैकी चार सामन्यांत त्याने सलामीची जबाबदारी सांभाळली आहे. ऋतुराजने वनडेमध्ये १९.१६च्या सरासरीने आणि एका अर्धशतकाच्या मदतीने ११५ धावा केल्या आहेत, ज्यात सलामीवीर म्हणून त्याच्या ९८ धावांचा समावेश आहे. ऋतुराजचे लिस्ट-ए क्रिकेटमधील आकडेही यशस्वीपेक्षा खूपच मजबूत आहेत.

एकंदरीत विचार केल्यास ऋतुराज गायकवाडचा सध्याचा फॉर्म त्याला मजबूत दावेदार बनवतो. भारतीय संघ व्यवस्थापनाने जर डाव्या-उजव्या हाताच्या फलंदाजांचे संयोजन वापरण्याचा निर्णय घेतला, तरच यशस्वी जैस्वालला संधी मिळू शकते.

## भारतीय हॉकी संघाची न्यूझीलंडवर रोमांचक मात

**इपोह (मलेशिया) : वृत्तसंस्था**

भारतीय हॉकी संघाने इपोह (मलेशिया) येथे सुरू असलेल्या सुलतान अझलन शाह चषक स्पर्धेतील आपल्या चौथ्या सामन्यात न्यूझीलंडचा ३-२ असा पराभव केला.

अमित रोहिदासने जोरदार ड्रॅग-फ्लिकद्वारे गोल करत भारताचे खाते उघडले. दुसऱ्या क्वार्टरमध्ये न्यूझीलंडच्या जॉर्ज बेकरने गोल करत त्यांची आघाडी कमी केली. चौथ्या क्वार्टरच्या सुरुवातीलाच न्यूझीलंडने पेनल्टी कॉर्नरद्वारे दुसरा गोल करण्याची संधी साधली आणि जॉर्ज बेकरच्या पुन्हा एकदा केलेल्या गोलमुळे सामना २-२ असा बरोबरीत आला. भारताने त्वरित प्रतिहल्ला करत अभिषेकने दिलेल्या पासवर सेल्वम कार्तीने सफाईदारपणे गोल करत भारताला पुन्हा एकदा ३-२ अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. हीच आघाडी अखेरपर्यंत कायम राहिली.

# डब्ल्यूपीएल ऑक्शनमध्ये स्मृती मानधनाचा सर्वात महागडी खेळाडूचा टॅग अबाधित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वूमन्स प्रीमियर लीग लिलावात अनेक खेळाडूंना कोट्यवधींची बोली लागली असली तरी लिलावात सहभागी होऊ न शकलेल्या स्मृती मानधनाचा डब्ल्यूपीएल आतापर्यंतच्या लिलावातील सर्वात महागडी खेळाडूचा टॅग मात्र अबाधित राहिला आहे. आरसीबीची कर्णधार स्मृती तिच्या कौटुंबिक कारणांमुळे या लिलावात सहभागी होऊ शकली नाही.

नवी दिल्लीमध्ये २७ नोव्हेंबर रोजी डब्ल्यूपीएल २०२६चा मेगा लिलाव झाला. या लिलावात २७७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यातील १९४ खेळाडू हे भारतीय, तर ८३ खेळाडू परदेशी होते. प्रत्येक फ्रेंचायजीने १८ खेळाडूंचा संघ निवडला. त्यात जास्ती जास्त सहा परदेशी खेळाडू ठेवण्याची मुभा होती.

रॉयल चॅलेंजर बंगळुरूची कर्णधार स्मृती मानधना ही डब्ल्यूपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडी खेळाडू ठरली आहे. २०२३च्या पहिल्या हंगामात आरसीबीने स्मृती मानधनाला ३.४० कोटी रुपयांमध्ये खरेदी केले होते. भारताची उपकर्णधार असलेली स्मृती तिच्या धडाकेबाज डावखुऱ्या फलंदाजीसाठी ओळखली जाते. इतकेच नाही तर आरसीबीला व्यावसायिक क्रिकेटमधील सर्वात पहिली ट्रॉफी जिंकून देण्याचा मानदेखील स्मृतीलाच मिळतो. आरसीबीने २०२४चे डब्ल्यूपीएल विजेतेपद पटकावले होते.




भारताची अष्टपैलू खेळाडू दिप्ती शर्माला यंदाच्या डब्ल्यूपीएल लिलावात छप्पर फाड के बोली लागली आहे. युपी वॉरियर्सने तिला ३.२० कोटी रुपयांत खरेदी केले. दिप्ती ही भारताची अव्वल फिरकीपटू असून ती मधल्या फळीत उत्तम फलंदाजीदेखील करू शकते. तिने आपल्या फलंदाजीच्या आणि गोलंदाजीच्या जोरावर भारताला अनेक सामने जिंकून दिले आहेत. दबावात चांगला खेळ करणे ही तिची जमेची बाजू आहे.

ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू खेळाडू अश्लेघ गार्डनरला डब्ल्यूपीएल २०२३च्या लिलावात ३.२ कोटी रुपयांची बोली लागली होती. ती एक उत्तम ऑफ स्पिनर असून आक्रमक फलंदाजी करण्याची तिची क्षमता आहे. त्यामुळे ती एक उत्तम अष्टपैलू पॅकेज आहे.

इंग्लंडची अष्टपैलू खेळाडू नताली सिव्हर ब्रंटलादेखील २०२३च्या लिलावात ३.२ कोटी रुपयांची बोली लागली होती. ती डब्ल्यूपीएल लिलावातील चौथ्या क्रमांकाची सर्वात महागडी खेळाडू ठरली आहे. ती मधल्या फळीतील एक आश्वासक फलंदाज आणि मध्यमगती गोलंदाज आहे. अष्टपैलू खेळामुळे ती संघातील एक महत्त्वाचा खेळाडू ठरते.

न्यूझीलंडची अष्टपैलू खेळाडू अमेलिया केरला मुंबई इंडियन्सने २०२६च्या लिलावात तीन कोटी रुपयांना खरेदी केले. केर ही डावखुरी फलंदाज असून ती भरवशाची ऑफ स्पिनरदेखील आहे. मुंबई इंडियन्सने तिच्यावर तीन कोटींची बोली लावली.

## महाराष्ट्र संघाने उडवला हैदराबादचा धुव्वा

*कॅप्टन्सीत पृथ्वी शॉचा हिट शो*

**कोलकाता : वृत्तसंस्था**

ऋतुराज गायकवाची टीम इंडियात एन्ट्री झाल्यावर महाराष्ट्र संघाचा कर्णधार झालेल्या पृथ्वी शॉने आपल्या धडाकेबाज खेळीचा नजराणा पेश केला. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात स्फोटक खेळीसह त्याने महाराष्ट्र संघाला या स्पर्धेतील पहिला विजय मिळवून दिला आहे. महाराष्ट्र संघाने जम्मू काश्मीरविरुद्धच्या लढतीने या स्पर्धेची सुरुवात केली होती. पहिल्या सामन्यात पराभवाचा सामना केल्यावर आता दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्र संघाने आपल्या फलंदाजीची ताकद दाखवून दिली.

कोलकाता येथील जादवपुर युनिव्हर्सिटी कॅम्पसच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना हैदराबादच्या संघाने निर्धारित २० षटकात ८ बाद १९१ धावा केल्या होत्या. पृथ्वी आणि या धावसंख्येचा पाठलाग करताना पृथ्वी शॉसह अर्शिन कुलकर्णी यांनी केलेल्या ११७ धावांच्या शतकी भागीदारीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने आठ विकेट्स आणि आठ चेंडू राखून दमदार विजय नोंदवला.

महाराष्ट्र संघाच्या डावाची सुरुवात करणाऱ्या पृथ्वी शॉने २३ चेंडूत अर्धशतक साजरे केले. या सामन्यात त्याने ३६ चेंडूत नऊ चौकार आणि तीन उत्तुंग षटकारासह १८३.३३च्या सरासरीसह ६६ धावा काढल्या. दुसऱ्या बाजूला अर्शिन कुलकर्णी ५४ चेंडूत १२ चौकारांसह दोन षटकारांच्या मदतीने ८९ धावांवर नाबाद राहिला.

मुंबईचा संघ सोडून महाराष्ट्र संघाकडून नवी सुरुवात करताना पृथ्वी शॉने रणजी सामन्यात धमाकेदार कामगिरी केली आहे. एका द्विशतकासह यंदाच्या रणजी हंगामात महाराष्ट्र संघाकडून तो सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याच्याकडे कामगिरीतील सातत्य दाखवत आयपीएलचा दरवाजा ठोठावण्याची संधी आहे.

# विराट कोहलीसाठी धोनी बनला सारथी..!

## रांचीमधील व्हिडीओ व्हायरल

**रांची : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या रांचीमध्ये आहे. भारतीय संघ ३० नोव्हेंबर रोजी जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियम कॉम्प्लेक्समध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय सामना खेळणार आहे. याच निमित्ताने भारतीय संघाचे दोन दिग्गज महेंद्रसिंह धोनी आणि विराट कोहली यांची खास भेट झाली.

रांचीमध्येच घर असलेल्या धोनीने गुरुवारी विराट कोहली आणि ऋषभ पंतला आपल्या घरी डिनरसाठी बोलावले होते. रात्री डिनर संपल्यानंतर भारतीय क्रिकेटच्या इतिहासात क्वचितच दिसणारा एक क्षण कॅमेऱ्यात कैद झाला.



डिनरनंतर धोनीने स्वतः गाडी चालवत विराट कोहलीला हॉटेलवर सोडले. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये धोनी गाडी चालवत आहे, तर विराट पुढच्या सीटवर बसलेला दिसत आहे. भारतीय क्रिकेटमधील सर्वात यशस्वी कर्णधार आणि त्याच्यानंतर तिन्ही फॉरमॅटमध्ये कर्णधारपद भूषवलेल्या खेळाडूचे हे 'रीयुनियन ऑफ द इयर' म्हणून वर्णन केले जात आहे. विराटने धोनीच्याच नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते, त्यामुळे त्यांच्यातील संबंध नेहमीच खास राहिले आहेत.

लंडनहून नुकताच परतलेला विराट कोहली बराच काळानंतर रांचीमध्ये सामना खेळणार आहे. गेल्या वर्षी इंग्लंडविरुद्धच्या मालिकेदरम्यान तो मुलाच्या जन्मामुळे संघाबाहेर होता.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या आगामी एकदिवसीय मालिकेत केएल राहुलकडे संघाची धुरा आहे. कर्णधार शुबमन गिल (मानेच्या दुखापतीमुळे) आणि उपकर्णधार श्रेयस अय्यर (दुखापतग्रस्त) यांच्या अनुपस्थितीमुळे राहुलला नेतृत्वाची संधी मिळाली आहे. या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही खेळत आहेत. दोन प्रमुख फलंदाज बाहेर असल्याने या दोन अनुभवी खेळाडूंवर संघाच्या फलंदाजीची आणि मालिकेतील विजयाची अतिरिक्त जबाबदारी असणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com